# दत्तकपणा 1

…मला हे ऐकून खूप बरे वाटते, हे चांगले आहे. बरे! असे नेहमीच आहे, जसे मी अगोदर म्हटले, "मी खूप आनंदी होतो, जेव्हा ते मला म्हणाले, आपण देवाच्या घरी जाऊया." मी विश्वास करतो कि दाविदाने एकदा हे विधान केले होते, "देवाच्या घरात जाऊया." मला कोणतीही अशी जागा माहित नाही, जी देवाच्या घरापेक्षा अधिक चांगली असेल; तुम्हाला माहित आहे का?

2 आता, आजच्या रात्री, इथे जॉर्जिया मधले आपले काही मित्र आहेत. ते बहुतेक आजच्या रात्रीच्या जेवणानंतर—नंतर घरी जाणार आहेत. आणि नंतर आपण… त्यांच्यातील काहीजण इथे राहतील. आणि जितक्या काही खोल्या आमच्याकडे आहेत त्या तुमच्यासाठी उघड्या आहेत.

3 आणि नंतर बुधवारी रात्री आपण, वचनाचा अभ्यास पुढे चालू ठेवू, आणि जर देवाची इच्छा असेल तर, पुढच्या रविवारीसुद्धा.

4 आणि नंतर शटाक्वा सहा तारखेला चालू होते. तर ज्या कोणी आपल्या सुट्टीच्या योजना आखल्या आहेत, आम्ही एक महान, अदभूत अशी वेळ शटाक्वाच्या वेळी अपेक्षितो. तिथेच आम्ही नेहमी इतका चांगला समय अनुभवितो. खूप जास्त लोकांची गर्दी नाही, कधी–कधी आम्ही…मला वाटते तिथे आपण दहा हजार लोकं अगदी सहजरीत्या सामावू शकतो. पण, सामान्यत:, गेल्या वर्षी मला वाटते तिथे सात हजार पर्यंत लोकं होते, असेच काहीतरी. ती जागा पूर्णपणे गच्च भरली होती, पण तिथे उभे राहण्यासाठी खूप जागा आहे. आणि काही आसने जी ते बाहेर आणू शकतात. आणि म्हणून आम्ही त्याची अपेक्षा करीत आहोत.

5 आणि मला इथे बऱ्याच सेवक भावांना बघून आनंद झाला. मला इथे त्याचे नाव सुचत नाहीये, ते सुवार्ताप्रचारक आहेत, भाऊ ह्युम्स आणि बहिण ह्युम्स, काय तुम्ही तिथे बसलेले आहात, आणि छोटी मंडळी, त्यांना इथे बघून आम्हाला आनंद होतो, एक सुवार्ताप्रचारक. दुसरेही, भाऊ पॅट, भाऊ डॉल्टेन, आणि, ओह, पुष्कळ असे, भाऊ बिलर. आणि भाऊ कॉलिन्सला थोड्या वेळाअगोदर मी पहिले. आणि, ओह, त्या सर्वांची नावे घेणे कठीण आहे. पण आम्ही तुम्हाला इथे देवाच्या घरात पाहताना खूप आनंदी आहोत. आम्ही देवाचे वचन शिकवित असताना माझ्याबरोबर प्रार्थना करण्यासाठी हे महान मौल्यवान भाऊ नेविल जे माझ्या मागे बसले आहेत. चार्ली, तुम्हाला आणि बहिण नेलीला आजच्या रात्री इथे बघून आनंद झाला, आणि छोटी मंडळी. हे…आणि बायबलचा अभ्यास हा सामान्यतः एक खूप…हो भाऊ वेल्च, मी केवळ…तुम्हाला शोधत होतो, आता तुम्ही तिथे मागे बसलेले मला दिसत आहा.

6 बायबलची शिकवण सामान्यतः अनिश्चित स्वरूपाची आहे, थोडेसे, तुम्हाला माहित आहे, जसे आपण म्हणतो, हे बर्फाच्या पातळ लादीवरून चालण्यासारखे आहे. पण आम्हाला असे वाटते की ह्या वेळेला, हे चांगलं असेल की, मंडळीला, जसे मला वाटते, पूर्ण समजुतीमध्ये आणणे की तिचे ख्रिस्तामध्ये काय स्थान आहे. आणि कधी–कधी मला वाटते की प्रचार करणे खूप अदभूत आहे, पण मी विश्वास करतो, भाऊ बिलर, कि की कधीकधी शिकवण देणे हे त्याच्या पलीकडे जाते, कृपाकरून…विशेषकरून मंडळीसाठी.

आता, प्रचार हा सामान्यतः पाप्याला पकडतो, त्याला वचनाने दोषाखाली आणतो. पण शिकवण मनुष्याला त्याची जागा दाखविते की तो कोण आहे. आणि जोपर्यंत आपली जागा कोठे आहे हे आपण जाणत नाही तोपर्यंत आपण खऱ्या प्रकारे विश्वास करू शकत नाही.

7 आता, जर ह्या चांगल्या भूमीच्या, संयुक्त राष्ट्रांनी, मला रशियामध्ये, ह्या राष्ट्राचा, राजदूत म्हणून पाठविले, तर मग जर त्यांनी मला अधिकृतपणे रशियामध्ये पाठविले आहे, तर संयुक्त राष्ट्रांची सर्व सत्ता माझ्या पाठीशी आहे. जर माझी ओळख एक राजदूत अशी असेल तर, माझा शब्द हा संयुक्त राष्ट्राच्या शब्दाइतकाच महत्वाचा आहे.

8 आणि मग जर देवाने आपल्याला त्याचे राजदूत म्हणून पाठविले आहे, सर्व सत्ता जी स्वर्गामध्ये आहे, सर्व जो देव आहे, त्याचे सर्व दूत आणि त्याची सर्व सत्ता आपल्या शब्दामागे उभी राहते, जर आपण योग्य प्रकारे अभिषेक केलेले, लोकांमध्ये पाठविलेले संदेशवाहक असू तर. देवाला वचनाचा सन्मान करणे आहे, कारण त्याने इतक्या दृढपणे लिहिले आहे की, "जे काही तुम्ही पृथ्वीवर बांधाल, ते मी स्वर्गात बांधीन. जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल, ते मी स्वर्गात मोकळे करीन. आणि मी तुम्हाकडे स्वर्गराज्याच्या किल्ल्या देतो." ओह, इतकी महान वचने त्याने मंडळीला दिली आहेत!

9 आणि मी, त्या दिवसानंतर...मला वाटते, तुमच्यातील बरेचजण आजच्या सकाळी इथे ऐकण्यासाठी हजर होते, जेव्हा मी बघितलेला स्वर्गाचा दृष्टांत, मी माझ्या नम्र व सोप्या रितीने सांगण्याचा प्रयत्न करीत होतो.

10 कोणीही जे काही त्यांना देवाने सांगितले ते त्यांनी मला सांगितले, त्यावर मी कधीही कोणत्याही प्रकारे संशय घेणार नाही. मी त्यावर विश्वास करीन जरी ते मला वचनात दिसले नाही, मला तरीही त्या भावाच्या शब्दावर विश्वास केला पाहिजे. मी—मी कदाचित बायबल वरच विश्वास करीन, पण मी असा विश्वास करीन की कदाचित भावाचा असा काहीतरी गैरसमज झाला असेल, की त्याने ते वचनात थोडेसे काहीतरी मिश्रण केले. आणि तरीही मी त्याला—त्याला माझा भाऊ म्हणुन विश्वास करीन.

11 आणि जर काही असे आहे जे माझ्या हृदयात जळत आहे, आणि मी आशा करतो की ते मला येणाऱ्या वर्षांत कधीही सोडणार नाही, की जे मागील आठवड्याच्या रविवारी सकाळी घडले ते मी कधीही विसरणार नाही. त्याने मला काहीतरी असे केले आहे ज्याने माझ्या जीवनात क्रांती झाली आहे. मी—मी भीत नाही. मला—मला मरणाची थोडीही भीती नाही. मरण काहीच भयप्राय नाही. आणि ते—ते तुमच्यासाठी नाही जर तुम्हाला समजले असेल. आता कदाचित जर...तुम्हाला समजण्यासाठी, याचा अनुभव घ्यावा लागेल, कारण कोणत्याही प्रकारे हे समजावणे अशक्य आहे. तुम्हाला शब्द सापडू शकत नाही, कारण ते इंग्रजी शब्दकोषात नाहीत, किंवा—किंवा कोणत्याही शब्दकोशात नाहीत, कारण ते अनंतकाळात आहेत; काल नाही, उद्या नाही, हा सर्व वर्तमानकाळ आहे. आणि हे असे नाही की, "मला खूप बरे वाटते," आणि एक तासानंतर, "मला विशेष बरे वाटत नाही," आणि एका तासानंतर, "पुन्हा बरे वाटते." हा नेहमी वर्तमानकाळ आहे. पाहिले? कधीच थांबणे नाही, केवळ ती उत्कृष्ठ शांती, काहीतरी असेच.

12 आणि तेथे पाप असू शकत नाही, तेथे द्वेष असू शकत नाही, तेथे आजार असू शकत नाही, तेथे—तेथे त्या स्वर्गीय किनाऱ्यावर काहीच पोहोचू शकत नाही. आणि जर माझ्याकडे विशेषाधिकार असता की मी हे बोलू शकलो असतो, पण कदाचित तो माझ्याकडे नाही. जर माझ्याकडे तो नाही, तर मी प्रार्थना करतो की देव मला क्षमा करो. पण जर माझ्याकडे तो विशेषाधिकार आहे आणि देवाने मला काही गोष्टी पाहण्यास

वर उचलले, तर मी त्याला पहिला स्वर्ग असे म्हणेन. आणि मग मी विश्वास करतो, बायबलमध्ये एक आहे ज्याचे नाव, मला वाटते तो पौल होता, ज्याला तिसऱ्या स्वर्गात उचलले गेले होते. आणि जर ह्या पहिल्या स्वर्गात इतके विस्मयकारक होते, तर त्या तिसऱ्या स्वर्गात काय असेल? ह्यात काहीच आश्चर्य नाही की तो त्याविषयी चौदा वर्षे बोलू शकला नाही! त्याने म्हटले की त्याला माहित नव्हते की तो शरीरामध्ये होता की शरीराविरहीत होता. त्या महान प्रेषिताबरोबर, मी त्या—त्या—त्याच्या कार्यालयाचा सहभागी होऊ इच्छित नाही, किंवा आपल्याला त्याच्यासारखे बनवण्याचा प्रयत्न करीत नाही, पण मी त्याच्याबरोबर म्हणू शकतो, मला माहित नाही की, मी शरीरात होतो की शरीराविरहीत होतो. एकच गोष्ट, की जितक्या वास्तवतेने मी तुम्हाला आता बघत आहे तितकेच ते वास्तविक होते.

13 आणि मी नेहमी ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त करायचो की जर मी निघून जाईन आणि मला एक छोटा ढग तरंगताना दिसेल, एक आत्मा, आणि म्हणेल, "ते पहा तिथे भाऊ आणि बहिण, ते चार्ली आणि नेली आहेत. ते भाऊ आणि बहिण स्पेन्सर तेथून जात आहेत." ह्याने मी नेहमी गोंधळात पडायचो. जर माझे डोळे कबरेत कुजत आहेत, आणि क्षय पावत आहेत, जर माझे कान ऐकण्यासाठी इथे नाहीत, आणि माझे पूर्ण रक्त गेले आहे आणि त्यांनी त्या जागी मसाला किंवा सुगंधी द्रव्य भरले आहे, आणि ते पाण्यामध्ये किंवा जमिनीमध्ये आहे, आणि माझी मानसिक कार्यक्षमता, माझ्या मेंदूच्या पेशी ह्या सर्व गेल्या असतील, तर मी एका तरंगत असलेल्या आत्म्यापेक्षा अधिक काय आहे? आणि हे मला अवघड वाटायचे. मला हे बोलण्यास किती आवडेल, "हेलो, भाऊ पॅट, अरे, तुला बघून खूप चांगले वाटले! हेलो, भाऊ नेविल, मला तुला बघून किती बरे वाटले!" पण मी विचार केला, "बरे, जर मला बघता यावे म्हणून माझ्याकडे काही नसेल, बोलण्यासाठी कोणते तोंड नाही, ते कुजले आहे, ते धूळ आहे, तर मी हे कसा बोलू शकेन, 'हेलो, भाऊ पॅट,' 'हेलो, भाऊ नेविल,' आणि असे काही, 'अरे, चार्ली'?"

14 परंतु आता मला माहित होते की ते चुकीचे आहे. कारण वचनात असे लिहिले आहे, जे मी म्हणतो की हे प्रतिकूल नाही, "कारण जरी हे पृथ्वीवरील निवासमंडप नष्ट करण्यात आले, आमच्यासाठी एक अगोदरच वाट पाहत आहे," दुसरे निवासस्थान ज्याला डोळे, कान, ओठ, मानसिक कार्यक्षमता आहे. "जर हे पृथ्वीवरील निवासस्थान नष्ट करण्यात आले!" त्याला एक शरीर आहे ज्याला मी स्पर्श करू शकतो, बोलू शकतो.

15 आणि आता हे माझ्याकडे आले, केवळ आता, की मोशे मरण पावला होता व एका खुण नसलेल्या कबरेत आठशे वर्षे होता, आणि एलिया पाचशे वर्षांअगोदर स्वर्गात गेला होता, परंतु रूपांतराच्या डोंगरावर ते येशुबरोबर बोलताना आढळले.

16 शमुवेल मरून कमीत–कमी तीन ते पाच वर्षे झाली होती, आणि एन–दोर येथील भूतविद्याप्रवीण स्त्रीने त्याला बोलविले, आणि ती पालथी पडली, आणि ती म्हणाली, "आपण मला फसविले, कारण आपण, शौल आहा." ती म्हणाली, "कारण मी दैवते पाहते!" ती एक अधर्मी होती, तुम्ही पाहा. "मला दैवत वर येताना दिसत आहे."

17 आणि शौल त्याला अजून पाहू शकला नव्हता, आणि तो म्हणाला, "त्याचे स्वरूप कसे आहे? मला त्याचे वर्णन करून सांग."

म्हणाली, "तो बारीक आहे आणि त्याने झगा घातला आहे."

18 म्हणाला, "तो शमुवेल, संदेष्टा आहे, त्याला इथे माझ्यासमोर आण." आणि माझी इच्छा आहे की तुम्ही हे लक्षात घ्यावे, की शमुवेलाने त्याच्या व्यक्तिमत्वातील काहीही

गमाविले नव्हते. तो अजूनही संदेष्टा होता. त्याने शौलाला दुसऱ्या दिवशी काय घडणार होते ते बरोबर सांगितले.

19 तर, तुम्ही पाहा, मरण आपल्याला पूर्णपणे कमी करत नाही की ज्याप्रकारे आपण कबरेवर रडतो आणि आक्रोश करतो आणि शोक करतो. ते केवळ आपली राहण्याची जागा बदलते. ते आपल्याला एका जागेतून घेते...वय काय आहे? जर मी अजून एक तास जगलो, तर मी खूप सोळा वर्षे वयाच्या व्यक्तींपेक्षा जास्त जगेन, मी खूप पाच–वर्षे–वयाच्या व्यक्तींपेक्षा जास्त जगेन. वय काहीच नाही. आपण इथे एका उद्देशासाठी आहोत, काहीतरी करण्यासाठी.

20 बरे, आता, येथे बसलेल्या बऱ्याच सुंदर चेहऱ्याच्या माता, त्यांतल्या काही साठ किंवा सत्तर वर्षांच्या आहेत, म्हणतील, “बरे, मी काय केले आहे, भाऊ ब्रॅन्हम?” तुम्ही तुमची मुलं वाढविली. तुम्हाला जे करणे होते ते तुम्ही केले आहे.

21 कदाचित इथे बसलेला कोणी वृद्ध पिता म्हणेल, “बरे, मी शेतात नांगरणी केली, मी हे केले आहे. मी कधीच प्रचार केला नाही.” पण तुम्ही बरोबर तेच केले जे करण्यासाठी देवाने तुम्हाला पाठविले. तुमच्यासाठी ती जागा आहे.

22 काल एका वृद्ध डॉक्टरांबरोबर बोलत होतो, ते माझ्या डॉक्टर मित्रांपैकी एक जिवलग मित्र, साधारण ऐंशीएक वर्षांचे. आणि त्यांची मेव्हणी आजच्या रात्री इथे मंडळीत आहे, आणि ती केवळ एक तरुणी, तरुणी थोडी त्यांच्याविषयी चिंतित आहे. आणि मी त्यांना बघण्यासाठी गेलो होतो. आणि जसे मी त्यांच्याबरोबर बोलण्यास सुरुवात केली, ते खुलले, त्यांनी मला एका शिकारीच्या सहलीविषयी सांगितले, जी त्यांनी खूप वर्षाअगोदर कोलोराडो येथे केली होती, तोच देश जेथे मी शिकार करतो. ते तितकेच हुशार आणि तेजस्वी होते! आणि मी म्हणालो, “डॉक्टर, तुम्ही कधीपासून सराव करत आहा?”

23 ते म्हणाले, “जेव्हा तू दुध पीत होतास तेव्हापासून.” आणि त्यापेक्षाही अगोदर. मी म्हणालो...“आणि खूप वेळा तर,” ते म्हणाले, “माझी बाबागाडी घेऊन, माझे खोगीर माझ्या घोड्यावर ठेवून, मी सराव करण्यास गेलो आहे. मी छोटीशी पिशवी घ्यायचो व चालू लागायचो.”

24 आणि मी म्हणालो, “होय, खाडीच्या किनाऱ्यावरून, पहाटे दोन वाजता, तुमचा प्रकाशझोत घेऊन, एखादे घर शोधण्यासाठी जेथे एखाद्या छोट्या मुलाचे पोट दुखत आहे किंवा एखादी आई प्रसूती वेदनेत आहे.”

“हे बरोबर आहे.”

25 आणि मी म्हणालो, “तुम्हाला माहित आहे, डॉक्टर, मी विश्वास करतो, कि, अशा प्रकारे सेवा करणाऱ्या चांगल्या वृद्ध डॉक्टरांसाठी देवाने, नाशवंत व अमरत्व दुभागणाऱ्या ह्या रेषेपलीकडे एक जागा ठेवली आहे.”

26 त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले व ते रडू लागले, त्यांनी त्यांचे कमजोर हात वर उचलून म्हटले, “भावा, मी तशीच आशा करतो.” ह्या प्रदेशापलीकडे देव मनुष्याच्या आत्म्याचा न्याय, तो जसा आहे त्याप्रमाणे करतो.

27 मग मी त्यांना हे समाधानकारक वचन दिले. अनेक वेळा, त्या काळ्या चिखलमय शेताची नांगरणी करत, रात्रीच्या वेळी कोणाची तरी मदत करण्यासाठी, कधीकधी मोबदल्यात एक पैसादेखील मिळाला नाही, पण हे सर्व ठीक आहे. मी म्हणालो, “येशूने वचनात म्हटले, ‘दया करणारे धन्य, कारण त्यांच्यावर दया केली जाईल.’” आणि ते सत्य आहे.

28 आणि आजच्या रात्री, जर देवाने संमती दिली तर, आम्हाला मंडळीला ह्या तीन धड्यांमध्ये ठेवायचे आहे, आपण कोण आहोत, हे कसे आणि काय म्हणून पाहावे. आपण पौलाने इफिसकरांस पाठविलेल्या पत्रांतील पहिल्या अध्यायातून सुरुवात करणार आहोत. आणि आपण पहिले तीन अध्याय आपल्या पुढील तीन अध्ययनात घेणार आहोत. संध्याकाळी एक अध्याय घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. आज रात्री, बुधवारी, आणि पुढच्या रविवारी सकाळी. इफिसकरांस पत्र पहला अध्याय. आता आपण अभ्यास करत असताना, मला हे सांगायचे आहे कि, इफिसकरांस पत्र हे पुस्तक, जुन्या करारांतील यहोशवाच्या पुस्तकाशी पूर्णपणे समांतर आहे.

29 आता, लक्षात ठेवा, जर आम्ही तुमच्या शिकवणुकीपासून थोडेसे दूर गेलो, तर काही वेळेपुरते आम्हाला सांभाळून घ्या. आपण ते उघडण्याअगोदर, आपण सर्वजण आपली मस्तके नमवून, त्याच्याकडून मदतीसाठी प्रार्थना करूया.

30 प्रभू, आम्ही तुझ्या पवित्र व वंदनीय अतिपवित्र लेखाकडे येत आहोत, जो सर्व आकाश व पृथ्वीहून जास्त सुरक्षित आहे. कारण आम्ही ह्या बायबल म्हटलेल्या पुस्तकांतील वचनात वाचतो, कि, "आकाश आणि पृथ्वी दोघेही नष्ट होतील, पण माझा शब्द कधीही पडणार नाही." मग, ह्या पवित्र क्षणात जेव्हा मी आजच्या रात्री ह्या व्यासपीठावर आलेलो असताना, तुझ्या रक्ताने विकत घेतलेल्या ह्या मौल्यवान अतिप्रिय लोकांपुढे, जे आजच्या रात्री इथे त्यांना शक्य असलेल्या प्रत्येक आशेला घट्ट पकडून जो प्रकाश येणार आहे त्याला धरून ठेवण्यासाठी. आजच्या रात्री, तो इतका पुरेसा असो, कि प्रत्येक विश्वास करणाऱ्याला त्याची जागा दिसो, आणि प्रत्येकजण जो अजूनही ह्या भव्य सहभागीतेत आला नाही, तो राज्यासाठी झटो, प्रभू, आणि दरवाजा तोपर्यंत ठोकत राहो जोपर्यंत द्वारपाळ दरवाजा उघडत नाही. हे मान्य कर, प्रभू.

31 आम्ही इथे वाचत आहोत जेथे ह्या बायबलचा खाजगी अनुवाद लावला जात नाही. देव करो आणि असे न होवो कि मी तुझा सेवक किंवा कोणत्याही दुसऱ्या सेवकाने वचनाला स्वतःचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. आम्हाला केवळ ते वाचू दे आणि जसे ते लिहिले आहे तसाच त्यावर विश्वास करू दे. आणि विशेषकरून आम्ही कळपाचे मेंढपाळ, आम्ही पाळक जे एक दिवस पलीकडे त्या सुंदर देशात छोट्या कळपासोबत एकत्र येऊ, आणि प्रभू येशूच्या उपस्थितीत उभे राहू, आणि पौल, आणि पेत्र, आणि लुक, आणि मार्क, आणि मत्तय ह्यांच्या वेळेची पिढी वर येताना पाहू, आणि त्यांचा त्यांच्या—त्यांच्या गटासोबत न्याय होताना पाहू. देवा, होऊ दे कि मी दहा दशलक्ष पारितोषिके तुझ्या पायाजवळ ठेवू शकेन आणि नम्रपणे रांगत वर येवून व माझे हात तुझ्या मौल्यवान पायाजवळ ठेवून म्हणेन, "प्रभू, ते तुझे आहेत."

32 हे देवा, आम्हाला नव्याने तुझ्या आत्म्याने, आणि तुझ्या प्रेमाने, आणि तुझ्या चांगुलपणाने भर. आणि होऊ दे कि आम्ही, ज्याप्रमाणे त्या कवीने खूप वर्षाअगोदर आपल्या कवितेमध्ये व्यक्त केले आहे, "मरणाऱ्या प्रिय कोकरा, तुझ्या मौल्यवान रक्ताचे सामर्थ्य कमी न होवो, जोपर्यंत देवाची सर्व मुक्त केलेली मंडळी पापापासून वाचत नाही. आणि जेव्हापासून, विश्वासाने, मी तो झरा पाहिला, ज्याचा पुरवठा तुझ्या वाहणाऱ्या जखमेतून होतो, तेव्हापासून, प्रेम परत विकत घेणे हाच माझा विषय आहे आणि मरणापर्यंत राहील. नंतर एका थोर व खूप गोड गीतामध्ये," तो पुढे म्हणतो, "जेव्हा हि गरीब बोबडी, व अडखळत बोलणारी जीभ कबरेमध्ये शांतपणे पडेल, तेव्हा मी तारणासाठी तुझ्या सामर्थ्याबद्दल गाईन." मग कबर तुझ्या मुलांसाठी कोणतेच मरण ठेवू शकत नाही. ती केवळ एक आरामाची जागा, किंवा लपण्याची जागा आहे, जेथे हे नाशवंत, अमरत्व परिधान करील.

33 प्रभू, जसे हे आमच्यासाठी वचनात दिले आहे तसे, आजच्या रात्री आम्हाला सरळपणे दिसू दे. आम्हाला समज दे. आणि आम्हाला आमच्या कर्तव्यपदी ठेव, कि जेणेकरून आम्ही तू येईपर्यंत विश्वासाने सेवा करू. आम्ही हे येशूच्या नावात, आणि त्याच्यासाठी मागतो. आमेन.

34 आता, जसे मी नुकताच म्हणत होतो, मी...माझ्या मते, इफिसकरांस पत्र हे पुस्तक नवीन करारातील महान पुस्तकांपैकी एक आहे. ते आम्हांला तेथे सोडते जेथे कॅल्विनवाद त्या टोकावर बाद होतो आणि आर्मेनियनवाद करणारेही दुसऱ्या टोकाला बाद होतात, परंतु, हे इफिसकराचे पुस्तक एकत्रित करते आणि मंडळीला तिच्या जागी बसविते.

35 आता मी ह्याची तुलना यहोशवाबरोबर केली आहे. जर तुम्ही लक्षात घेतले, इस्राएल इजिप्तमधून बाहेर काढण्यात आले, आणि तिथे त्यांच्या प्रवासाचे तीन टप्पे आहेत. पहिला टप्पा, मिसर सोडणे होता. नंतरचा टप्पा रानातील प्रवास हा होता. आणि नंतरचा टप्पा कनान होता.

36 आता कनान हजार वर्षे राज्याचा काळाला दर्शवित नाही. तो केवळ विजय मिळविण्याच्या काळाला दर्शवितो, विजय प्राप्त करण्याचा कालखंड, कारण कनानामध्ये त्यांनी हत्या केली आणि जाळले आणि शहरे घेतली. आणि हजार वर्षे राज्याच्या काळात मरण नसणार.

37 पण अजून एक गोष्ट ते करते ती म्हणजे, ते नीतिमान ठरविते, त्यांनी मोशेवर विश्वास ठेवून ते इजिप्तमधून निघाले तेव्हा. अग्निस्तंभाखाली पवित्रीकरण आणि रानामध्ये कोकराच्या यज्ञासंबंधी प्रायश्चित्त. आणि नंतर अभिवचन दिलेल्या देशामध्ये प्रवेश करणे.

38 आता, नवीन करारातील विश्वासणाऱ्यासाठी कोणता प्रदेश अभिवचन म्हणून दिला आहे? पवित्र आत्मा हा अभिवचन आहे. "कारण शेवटल्या दिवसांत असे होईल," योएल 2:28, "की मी मनुष्यमात्रांवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन. तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील. आणि तुमचे दास व दासी ह्यांवरही मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन, आणि ते भविष्य सांगतील. मी वर आकाशांत चिन्हे दाखवीन. आणि पृथ्वीवर, अग्निस्तंभ, आणि धुराचे लोळ आणि बाष्प." आणि पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी, त्याचा मजकूर घेतला व प्रचार करून म्हटले, "तुम्हांतील प्रत्येकजण, तुमची पापे पुसली जावी म्हणून पश्चाताप करा आणि येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घ्या," पापमोचनासाठी, क्षमा व्हावी म्हणून, सर्व उल्लंघनाची कृत्ये दूर घेतली जावीत म्हणून.

39 तुमच्या लक्षात आले का, यहोशवा, त्यांनी यार्देन पार करण्याअगोदर, यहोशावाने म्हटले, "छावणीतून जा आणि तुमची वस्त्रे स्वच्छ करा, आणि तुम्ही प्रत्येक जण स्वतःला पवित्र करा, आणि कोणीही मनुष्य आपल्या स्त्रीकडे न जावो कारण तीन दिवसांत तुम्ही परमेश्वराचे गौरव पाहाल." पाहिले? वचन वारशाने मिळविण्याची हि—हि एक प्रक्रिया आहे. आता, इस्राएलसाठी वचन हे होते, जे अब्राहामाला देवाने दिले होते, कि पलीष्ट्यांचा प्रदेश कायमचा त्यांच्या ताब्यात येईल. आणि ते नेहमीचे ह्याच प्रदेशात राहणार होते.

40 आता, ते ह्या वचनदत्त देशात तीन टप्प्यांमध्ये येत आहेत. आता पाहा, ह्याचे दर्शक नवीन करारात परिपूर्णरीत्या आहे.

41 आता, जसे मी सांगितले, हे तुमच्या काही विचारांना पटणारे नाही. तुमच्यांतील काही मौल्यवान नाझरीन लोकं, देवाची मंडळी आणि सर्व, ह्याने तुम्ही दु:खित होऊ नका, पण केवळ त्या जवळून पाहा आणि त्याचे दर्शक पाहा. पाहा आणि जाणा कि प्रत्येक ठिकाणी हा कसा बिनचूक टोला मारते.

42 तेथे त्यांच्या प्रवासाचे तीन टप्पे होते, आणि येथे ह्या प्रवासाचे तीन टप्पे आहेत. कारण, आपण येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे न्यायी ठरविले गेलो आहोत, मिसर देशाचा त्याग करून बाहेर आलो. आणि नंतर आपल्याला त्याच्या रक्ताच्या अर्पणाद्वारे पवित्र करण्यात आले, आणि आपण यात्रेकरू आणि तात्पुरते इथे राहणारे झालो, आणि आपण दावा करतो कि आपण त्या प्रदेशाच्या शोधात आहोत, एक नगरी जी येत आहे, किंवा वचनदत्त आहे.

43 आणि अशाच प्रकारे इस्राएली लोकं रानात तात्पुरते होते, त्यांना राहण्यासाठी जागा नव्हती, ते अग्निस्तंभाला अनुसरत रात्रीमागून रात्री प्रवास करत होते, पण शेवटी ते वचनदत्त देशात आले जिथे ते स्थायिक झाले.

44 विश्वासणाराही ह्याच टप्प्यात येतो. त्याला प्रथम जाणीव होते कि तो एक पापी मनुष्य आहे; मग तो पाण्याद्वारे वेगळा केला जातो, पाण्याच्या स्नानाने, रक्ताद्वारे, आणि... किंवा वचनाद्वारे पाण्याच्या स्नानाने, प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास करण्याने, विशेषकरून. मग विश्वासाद्वारे न्यायी ठरविला जातो, तो त्याचा भागीदार बनतो, आणि ख्रिस्ताद्वारे देवाबरोबर समेट घडतो, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा होतो, स्वत:ला या प्रवासात वगळतो. तुम्हाला हे समजले का? प्रवासामध्ये! मग तो एक तात्पुरता इथे राहणारा प्रवासी व यात्रेकरू बनतो. तो कोणत्या ठिकाणच्या प्रवासामध्ये आहे? एक अभिवचन जे देवाने दिले.

45 इस्राएल लोकांना अजून अभिवचन मिळाले नव्हते, परंतु ते प्रवासामध्ये होते. आणि न उभारता...कृपया हे समजून घ्या. इथेच तुम्ही नाजरीन आणि पिलग्रिम होलीनेस, आणि तुम्ही सर्व चुकता. कारण, इस्राएल लोकं जेव्हा कादेश बर्ना येथे आले, जेव्हा हेर तेथे जाऊन आले व म्हणाले, “तो प्रदेश अदभूत आहे,” पण त्यांतले काही परत आले आणि म्हणाले, “आपण तो घेऊ शकत नाही, कारण त्या शहरांभोवती तटबंदी आहे वगैरे वगैरे.” परंतु यहोशवा व कालेब उभे राहिले, आणि म्हणाले, “आपण तो घेण्यासाठी समर्थ आहोत!” त्यांच्या अगोदरच स्वाक्षरी करून दस्तऐवज केलेल्या विधानांमुळे, त्यांनी कृपेच्या दोन कार्यांवर विश्वास केला, न्यायीपण आणि पवित्रीकरण, आणि ते अजून पुढे जाऊ शकले नाही. आणि, ऐका, ती पूर्ण पिढी रानामध्ये नाश पावली. दोन जण जे वचनदत्त देशात गेले आणि पुराव्यानिशी आले कि ते एक दैवी शहर होते, “आणि आपण तो घेण्यासाठी समर्थ आहोत, कारण ते देवाचे वचन होते.” आणि लोकांनी पवित्र आत्मा घेणे, अन्य भाषा बोलणे, देवाचे सामर्थ्य स्वीकारणे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, चिन्हे, आश्चर्ये, चमत्कार, हे स्वीकारण्याऐवजी त्यांना असे वाटले कि ह्या सर्वांमुळे त्यांची पारंपारिक शिकवण खंडित पडेल. आणि त्यांचे काय झाले? त्या प्रदेशामध्ये नाश पावले! हे बरोबर आहे.

46 परंतु, कालेब आणि यहोशवासारखे, विश्वासी, जे वचनावर चालत होते, ते त्या प्रदेशामध्ये गेले, आणि मालकी करून तो प्रदेश घेतला, व तिथे स्थायिक झाले. आणि आपण न्यायीपण, पवित्रीकरण ह्यांवर थांबणार नाही. आपण पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्यापर्यंत जाऊया. त्याने आपल्याला पापी जीवनातून शुद्ध केले म्हणून आपल्याला तेथेच थांबायचे नाही. पण आता आम्ही जोर देतो, एका स्थानामध्ये उभे राहण्यासाठी, पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याच्या अभिवचनावर. कारण पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी म्हटले, “कारण हे अभिवचन तुमच्यासाठी आहे, आणि तुमच्या मुलाबाळांसाठी आहे, आणि जे दूर आहेत त्यांच्यासाठी, आणि जितक्यांना आपला प्रभू देव बोलावतो तितक्यांसाठी आहे.”

47 तर मग इथे इफिसकरांस पत्र आपल्याला यहोशवाप्रमाणे एका स्थानावर ठेवते. तुम्ही लक्षात घ्या, त्या प्रदेशापलीकडे जाऊन तो प्रदेश काबीज केल्यानंतर, यहोशावाने त्या देशाची वाटणी केली. "एफ्राईम *इथे*, मनश्शे *इथे*, आणि हा *इथे*, गाद *इथे*, बन्यामीन *इथे*." त्याने त्या प्रदेशाची वाटणी केली.

48 आणि लक्ष दया! ओह, ह्याने आमची हृदये पेटत आहेत! तेथील प्रत्येक इब्री माता, ज्यावेळी त्या बालकांना जन्म देत असे, ती प्रसुतीवेदनेत असताना त्याच जागी बोलत असे कि तिच्या बाळाची जागा वचनदत्त देशात कुठे असेल. ओह, हा एक महान अभ्यास आहे! जर आपण ह्यामध्ये अधिक सविस्तर बघितले, ज्यासाठी आपल्याला तासनतास लागतील. कधीतरी एके दिवशी जेव्हा आपल्या चर्चची डागडुजी पूर्ण होईल, मला येऊन चांगले एक किंवा दोन महिने घेण्यास आवडेल, केवळ ह्यावरच शिकविण्यासाठी. पाहा जेव्हा ते, त्यांच्यातील प्रत्येक आई, जेव्हा ती प्रसूतीवेदनेत असताना हाक मारी, "एफ्राईम," तेव्हा ती त्याचे पाय तेलामध्ये कोणत्या जागी असणार हे ठरवी. आणि अशाच प्रकारे ते सर्व जेथे कुठे ते असत.

49 आणि यहोशवा, हे जाणत नव्हता, परंतु प्रेरणेने, पवित्र आत्म्याच्या नेतृत्वाखाली, वचनदत्त देशात गेल्यानंतर, प्रत्येक मनुष्याला वचन दिले, अगदी तेच जे पवित्र आत्म्याने जन्माद्वारे अभिवचन दिले होते.

50 हे कसे आहे कि देवाने मंडळीमध्ये काहींना प्रसूतिवेदनेत ठेवले आहे! ओह, कधीकधी त्या खूप भयानक होतात. जेव्हा मंडळी बाहेरील जगाच्या छळाखाली कण्हते, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवत, कि पवित्र आत्म्याचे वचन आपल्यासाठी तितकेच खरे आहे जितके पेंटेकॉस्टसाठी होते, कसे ते प्रसूती वेदनेत कण्हतात व रडतात! परंतु जेव्हा ते जन्म घेतात, आणि देवाच्या राज्यातील स्थानात जन्म घेतात, तेव्हा पवित्र आत्मा मंडळीत काही प्रेषित, काही संदेष्टे, काही शिक्षक, काही पाळक, काही प्रचारक असे करतो. आणि नंतर तो तुम्हाला, अन्य भाषेत बोलणे, अन्य भाषेत बोललेल्याचा अर्थ सांगणे, ज्ञान, शहाणपण, बरे करण्याचे दान, सर्व प्रकारचे चमत्कार अशी दाने देतो.

51 मंडळी कुठे आहे...आता हे करण्यामागे माझा हा उद्देश आहे. मंडळी नेहमी दुसऱ्या कोणाचीतरी बाजू घेण्याचा प्रयत्न करते. पण तसे करू नका. जर तुम्ही मनश्शे असाल तर तुम्ही एफ्राईमच्या कोपऱ्यात कधीच मका उगवू शकत नाही. तुम्हाला ख्रिस्तामधील तुमचे स्थान घेणे आहे. ओह, हे खूप खोल आणि संपन्न होते जेव्हा आपण इथे येतो, हे कसे काय कि देव मंडळीमध्ये एकाला अन्य भाषेत बोलण्याचे दान देतो, दुसऱ्याला... आता, आपल्याला अनेक वेळा शिकविले गेले आहे, "आपणा सर्वांना अन्य भाषेत बोलले पाहिजे." हे चुकीचे आहे. "आपल्या सर्वांना हे केले पाहिजे." नाही, आपल्याला करणे नाही. त्या सर्वांनी एकच गोष्ट केली नाही. प्रत्येक जण...

52 प्रत्येकाला, तो देश प्रेरणेने दिला आणि विभागला होता. आणि, प्रत्येक जण, मी तुम्हाला वचन घेऊन हे अगदी बरोबर दाखवू शकतो. कि त्याने प्रत्येकाला ते ज्या स्थानात असायला हवे होते तेथेच ठेवले, हे कसेकाय कि दोन अर्ध्या वंशाना नदीच्या पलीकडे राहणे होते, आणि कशा प्रकारे त्यांच्या मातांनी त्यांच्या जन्माच्या वेळी हे ओरडून सांगितले, आणि हे कसे कि प्रत्येक जागा निश्चित केली होती.

53 आणि आता जेव्हा तुम्ही आत आहा, ह्याचा अर्थ असा नाही कि तुम्ही युद्धापासुन मोकळे आहा. तुम्हाला अजूनही, तुम्ही उभ्या असलेल्या भूमीच्या प्रत्येक इंचासाठी लढणे आहे. तर मग, पाहा, कनान हे महान स्वर्गाचे प्रतिक नव्हते, कारण तेथे युद्ध आणि संकटे

आणि खून आणि झगडे आणि असे सर्व काही होते. परंतु ते ह्याचे प्रतिक आज हे आहे कि, आपले चालणे हे परिपूर्ण असायला हवे.

54 तेथेच आज मंडळी आज अपयशी ठरत आहे, त्या चालण्यामध्ये. तुम्हाला हे ठाऊक आहे का कि तुमची स्वतःची वर्तणूक दुसऱ्या कोणालातरी आरोग्य मिळण्यापासून बाहेर करू शकते? तुमची गैरवर्तणूक, तुम्हा विश्वासणाऱ्यांची न कबूल केलेली पापे, मंडळीला कडवटपणे अपयशी होण्यास, कारणीभूत ठरू शकते. आणि न्यायाच्या दिवशी तुम्ही त्यासाठी पूर्णपणे जबाबदार असाल. “ओह,” तुम्ही म्हणाल, “आता, एक मिनिट थांबा, भाऊ ब्रॅन्हम.” बरे, ते सत्य आहे. ह्याबद्दल विचार करा!

55 यहोशवाला, त्याने ओलांडून त्या प्रदेशात गेल्यानंतर, देवाने त्याला अभिवचन दिले कि…फक्त विचार करा, एकही मनुष्य न गमाविता, एकही ओरबाडा न येता, एकाही परिचारिका किंवा प्रथमोपचार किंवा एक पट्टीचीही गरज न भासता पूर्ण मोहीम लढण्यास सांगितले. आमेन. देवाने म्हटले, “तो प्रदेश तुमचा आहे, जा लढा.” विचार करा, एक मोहीम लढायची आहे, आणि तेथे एकही लाल चिन्ह नाही, कोणालाही कोणतीच इजा होणार नाही!

56 आणि त्यांनी अमोरी आणि हित्ती लोकांचा वध केला, परंतु त्यांच्यातील एकालाही इजा झाली नाही जोपर्यंत छावणीमध्ये पाप आले नाही. आणि जेव्हा आखानाने शिनारी झगा आणि सोन्याच्या विटा घेतल्या, आणि त्याच्या छावणीत लपविल्या, तेव्हा दुसऱ्या दिवशी त्यांनी सोळा पुरुष गमावले. यहोशवा म्हणाला, “थांबा! थांबा! एक मिनिट, काहीतरी चुकीचे होत आहे! इथे काहीतरी चुकीचे आहे. आपण सात दिवस उपवास करणार आहोत. देवाने आपल्याला वचन दिले, ‘काहीही आपल्याला इजा करू शकत नाही.’ आपले शत्रू आपल्या पायाखाली पडतील. आणि इथे काहीतरी चुकीचे आहे. कुठेतरी काहीतरी चुकीचे झाले आहे, कारण इथे आपले सोळा पुरुष मृत्युमुखी पडले आहेत. ते इस्राएली भाऊ आहेत आणि ते मृत्यू पावले आहेत.”

57 ते का मेले, निष्कलंक मनुष्य? कारण एक मनुष्य मर्यादेबाहेर निघून गेला. तुम्ही पाहत आहा हे शिकविण्याची गरज आहे का? मंडळीने सरळ करावे, देवाच्या वचनाबरोबर स्वतःला सरळ करावे, देवाबरोबर व इतरांबरोबर स्वतःला सरळ करावे, सर्व मनुष्यांपुढे, सौम्यपणे व देवाला भीत, परिपूर्णपणे चालावे. कारण एका मनुष्याने वस्त्र चोरले, आणि जे त्याने करायला नको होते ते केले, सोळा मनुष्यांचे प्राण घेतले! मला वाटते ते सोळा होते, कदाचित जास्त. मी विश्वास करतो कि ते सोळा पुरुष होते जे मेले.

58 यहोशवाने बोलाविले, म्हटले, “काहीतरी चुकले आहे! देवाने वचन दिले होते, आणि काहीतरी चुकले आहे.”

59 जेव्हा आपण आजाऱ्यांना आपल्यापुढे आणतो, आणि ते बरे होत नाहीत, आपल्याला गंभीर उपवास करण्याची गरज आहे, सभा बोलावणे आहे. कुठेतरी काहीतरी चूक आहे. देवाने वचन दिले आहे, देवाला त्या वचनाशी चिकटून राहणे आहे, आणि तो करील.

60 त्याने उपवास करण्यास सांगितले. आणि त्यांना समजले, त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या. आणि आखानाने ते कबुल केले. आणि त्यांनी आखान, त्याचे कुटुंब व सर्वांना ठार केले, त्यांची राख जाळली, आणि तिथे आठवणीसाठी ठेवली. आणि यहोशवा सरळ युद्धासाठी गेला, सर्व काही घेतले, एकही ओरबाडा किंवा जखमेशिवाय. तेथे तुम्ही आहा.

61 एक दिवस त्याला थोडा अधिक वेळ हवा होता. सूर्य मावळत होता, त्याची माणसे रात्रीच्या वेळी चांगल्या प्रकारे लढू शकत नव्हते. यहोशवा, तो महान योद्धा, देवाने अभिषिक्त केलेला, त्या प्रदेशात योग्य प्रकारे स्थानबद्ध केलेला, ज्याप्रमाणे नवीन

मंडळीसाठी इफिसकरांस पत्र, ताबा, ताब्यात घेतला, प्रदेश ताब्यात घेत, तो हाती घेत. त्याला थोडा अधिक वेळ हवा होता, म्हणून तो म्हणाला, “सूर्य, थांब!” आणि सूर्य जवळ–जवळ बारा तास तसाच थांबला, त्याने तो देश घेईपर्यंत. पाहिले?

62 आता इफिसकरांस पत्र हे पुस्तक आपल्याला ख्रिस्तामध्ये स्थानबद्ध करते, जसे ते पवित्र भूमीमध्ये होते. आपल्याला पवित्र भूमीमध्ये ठेवले नाही, तर पवित्र आत्म्यामध्ये ठेवले आहे! आता आपण केवळ एक वचन वाचूया, पाहा मंडळी किती परिपूर्ण आहे,...

*पौल, जो ख्रिस्त येशूचा प्रेषित, देवाच्या इच्छेप्रमाणे...*

63 ओह, मला हे आवडते! देवाने त्याला प्रेषित केले. कोणी वडिलांनी त्याच्यावर हात ठेवले नाही, कोणी बिशपांनी त्याला कुठे पाठविले नाही, तर देवाने त्याला बोलाविले आणि त्याला एक प्रेषित केले.

*पौल, देवाच्या इच्छेने, ख्रिस्त येशूचा प्रेषित त्याच्याकडून, इफिसांत जे पवित्र (पवित्र केलेले) आणि ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वासू आहेत त्यांना*

64 पाहा तो हे कसे संबोधितो. हे अविश्वासणाऱ्यांसाठी नाही. हे मंडळीसाठी आहे. हे वेगळे केलेल्यांसाठी संबोधिले आहे, पवित्र केलेले आणि बोलाविलेले जे येशू ख्रिस्तामध्ये आहेत.

65 आता, जर तुम्हाला हे जाणून घ्यायचे असेल की आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो, जर तुम्ही करिंथकरास पहिले पत्र 12 वा अध्याय उघडला, तेथे म्हटले आहे, “कारण एका आत्म्याद्वारे आपण सर्व एका शरीरात बाप्तिस्मा घेतला आहे.” कसे? कशाद्वारे बाप्तिस्मा घेतला? पवित्र आत्मा. पाण्याच्या बाप्तीसाम्याने नव्हे, तुम्ही चर्च ऑफ क्राईस्टचे लोकहो, परंतु एक कॅपिटल शब्द, एस–पी–आर–आय–टी, एका आत्म्याने. एका हस्तांदोलनाने नाही, एका शब्दाने, एका शिंपडण्याने नव्हे. परंतु, “एका आत्म्याने, आपणा सर्वांना एका शरीरात बाप्तिस्मा मिळाला आहे,” आपली मालमत्ता, तो प्रदेश जे देव आपल्याला राहण्यासाठी देतो, तो पवित्र आत्मा. ज्याप्रमाणे त्याने यहुदी लोकांना कनान दिला, त्याचप्रमाणे आपल्याला त्याने पवित्र आत्मा दिला आहे. “एका आत्म्याने, आपणा सर्वांना एका शरीरात बाप्तिस्मा मिळाला आहे.” तुम्हाला हे समजत आहे का?

66 आता, तो आत्मिक कनानी लोकांशी बोलत आहे, इस्त्राएल, आत्मिक इस्त्राएल ज्यांनी तो प्रदेश ताब्यात घेतला आहे. ओह, तुम्ही मिसराच्या लसुणापासून बाहेर आला ह्याबद्दल तुम्हाला आनंद होत नाही का? तुम्ही आनंदी नाहीत का की तुम्ही रानातून बाहेर आला आहा? आणि, लक्षात ठेवा, जोपर्यंत ते पलीकडे त्या प्रदेशात गेले नव्हते, तोपर्यंत त्यांना मान्ना खावा लागला, जी देवदूतांची भाकर असून स्वर्गातून पडत होती. आणि जेव्हा ते ओलांडून त्या प्रदेशात गेले तेव्हा मान्ना पडणे बंद झाले. तेव्हा ते पूर्ण प्रौढ झाले होते आणि ते त्या प्रदेशातील मका खात. आता, आता जेव्हा तुम्ही बाळक राहिले नाहीत, आता जेव्हा तुम्ही शुभवर्तमानाच्या निऱ्या दुधाची अपेक्षा करत नाहीत, आणि तुम्हाला लाडीगुडी लावावी लागत नाही, थाप मारावी लागत नाही, आणि चर्चला येण्यासाठी खात्री पटवून सांगण्याची गरज नाही, आता जेव्हा तुम्ही पूर्ण परिपक्व आहात, तर आता तुम्ही जड मांस खाण्यास तयार आहा. “त्याने जे काही सांगितले त्यामध्ये येण्यासाठी तुम्ही तयार आहा.” तुम्ही काहीतरी जे मौल्यवान आणि खोल आहे ते समजण्यासाठी तयार आहा. ओह, आपण त्यामध्ये सरळ बघुया. आणि, ओह, हे युगाच्या स्थापनेपासून लपविले होते. तो म्हणाला, “आता तुम्ही ह्यामध्ये आले असता, मी हे तुम्हाला उद्देशून बोलत आहे.” जे नुकतेच इजिप्तमधून बाहेर पडले आहे त्यांना नव्हे, जे अजून प्रवासात आहेत त्यांना नव्हे, परंतु जे वचनदत्त देशात असून ज्यांना अभिवचन मिळाले आहे त्यांना.

67 किती जणांनी पवित्र आत्म्याचे अभिवचन स्वीकारले आहे? ओह, तुम्ही आनंदी नाहीत का, की तुम्ही इथे ह्या ठिकाणी त्या प्रदेशात आहा, मका खात आहा, देवाच्या अवघड गोष्टी खात आहा आणि त्याविषयी स्पष्ट समज तुम्हाला आहे. तुमचे—तुमचे आत्मिक मन गोंधळाविरहीत आहे. तुम्हाला तो कोण आहे हे बरोबर माहित आहे. तो काय आहे हे तुम्हाला बरोबर माहित आहे. तुम्हाला त्याविषयी सर्व बरोबर माहित आहे. तुम्हाला माहित आहे की ज्यावर तुम्ही विश्वास ठेवला आहे आणि पूर्ण खात्री आहे, की जे त्याच्या हाती दिले आहे त्या दिवसापर्यंत राखायला तो समर्थ आहे. ओह, आता, तेच ते आहेत, ज्यांच्याशी पौल बोलत आहे. लक्षपूर्वक ऐका. आता ध्यान दया.

...*येशुख्रिस्तामधील विश्वासू;*

68 आता, मला मंडळीला हे पुन्हा एकदा सांगू दया. आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो? चर्चमध्ये सामील होऊन? नाही. आपले नाव पुस्तकामध्ये लिहून? नाही. बुडून बाप्तिस्मा घेण्याने? नाही. आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो? एका आत्म्याने आपण सर्व एका अभिवचनामध्ये, जे शरीरा, त्यामध्ये बाप्तिस्मा पावलो आहोत, आणि जे काही त्या प्रदेशात आहे त्या सर्वांचे आपण भागीदार आहोत. आमेन! ओह, मला—मला हे आवडते. जर माझा आवाज घोगरा नसता तर मी ओरडू शकलो असतो. बापरे, जेव्हा मी त्या देशात जातो तेव्हा तो माझा आहे. मी आता माझ्या घरी आही, मी कनानात आहे. परमेश्वर ज्या कोणत्या गोष्टीसाठी मला वापरू इच्छितो त्यासाठी मी तयार आहे. मी पवित्र भूमीवर चालत आहे, एक राजाचा पुत्र, झगा घालून तयार आहे. मी मिसरामधून बाहेर आलो आहे, वचनदत्त देशात आलो आहे, परीक्षेत उभा राहून, यार्देन पार करून पलीकडे या आशीर्वादित वचनाकडे आलो आहे. ओह, मला हे कसे मिळाले? एका आत्म्याने. तसेच जसे पौलाला मिळाले, ज्याप्रमाणे त्याने पौलावर कृती केली आणि तुमच्यावर केली त्याचप्रमाणे त्याने माझ्यावरही कृती केली. "एका आत्म्यामध्ये आपणा सर्वांचा बाप्तिस्मा झाला आहे." शिंपडून नव्हे, केवळ त्यातला थोडा शिडकावा आणि खूप बरे वाटले; पण खाली बुडून! ते सर्व पवित्र आत्म्यामध्ये त्याखाली बुडी मारण्यासाठी. हेच अभिवचन आहे.

69 आपले इफिसकरांस पत्र, आपला यहोशवा, जो पवित्र आत्मा आहे, *यहोशवा* म्हणजे, "येशू, उद्धारकर्ता." *यहोशवा* म्हणजे पवित्र आत्मा, हे आत्मिक दर्शक आहे जसे नैसर्गिक होते, की तो आपला महान योद्धा आहे. तो आपला महान पुढारी आहे. जसा देव यहोशवाबरोबर होता, त्याचप्रमाणे देव (पवित्र आत्म्याने) आपल्याला चालवितो. आणि जेव्हा छावणीमध्ये पाप येते, तेव्हा पवित्र आत्मा थांबवितो, "इथे मंडळीमध्ये काय चुकीचे आहे? काहीतरी चुकीचे आहे." ओह, तुम्ही पाहू शकत नाहीत का की आपल्याकडे आता किती जास्त किशाचे पुत्र आहेत? अनेक असे शौल, सेमिनरी आणि देवविषयक शिक्षणाच्या विद्यालयांतून बाहेर पडत आहेत आणि बाहेर जाऊन ह्या विकृत गोष्टी शिकवत आहेत, जसे बायबलमध्ये म्हटले आहे की ते करतील. "वरवर पाहता, विश्वास नसणारे, स्वतःला तुमच्यापासून वेगळे करणारे, तुमच्याबरोबर सहभागीता न करणारे, आणि वगैरे वगैरे, सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरूप घेऊन आणि सामर्थ्य नाकारणारे, अशांपासून दूर पळा." ते कुठून आले हे त्यांना माहित नाही, ते काहीच कारण देऊ शकत नाहीत.

70 माझे एक मित्र भाऊ बूथ क्लिबॉन ह्यांच्याकडून मला हे समजले ते मी सांगतो, जर ह्या...जगात अनौरस, देवापासून न बनलेले असे काही असेल तर ते एक खेचर आहे. एक खेचर हे सर्व गोष्टीमधील सर्वात खालच्या दर्ज्याचे आहे. ते एक...ते—ते त्याला माहित नाही की ते काय आहे. ते त्याच्यासारखे दुसरे उत्पन्न करू शकत नाही. एक खेचर दुसऱ्या खेचराबरोबर सबंध करून खेचराची पैदास करू शकत नाही. ते संपले आहे.

त्याला माहित नाही की त्याचे वडील कुठून आले, आणि त्याच्या आईविषयीही त्याला माहित नाही, कारण ते थोड्या प्रमाणात गाढव आहे आणि एक घोडी आहे. देवाने असे कधीच केले नव्हते. तुम्ही कधीच अश्या प्रकारचे देवावर थोपवू नका. देव असे कधीच करत नाही. देवाने म्हटले, “सर्वकाही आपापल्या जातीचे उपजवो.” होय महाशय. पण एक—एक खेचर हे एक—एक…त्याचे वडील एक गाढव होते आणि त्याची आई एक घोडी होती, म्हणून त्याला माहित नाही की तो कोणाच्या मालकीचा आहे. तो—तो—तो एक घोडा आहे जो खेचर बनण्याचा प्रयत्न करत आहे, किंवा एक खेचर…किंवा—किंवा तो एक घोडा आहे जो गाढव बनण्याचा प्रयत्न करत आहे, किंवा एक गाढव आहे जो घोडा बनण्याचा प्रयत्न करत आहे. त्याला माहित नाही की तो कोणाच्या मालकीचा आहे. आणि तो जगांतील सर्वात कठीण डोक्याचा (मंद) आहे. तुम्ही त्यावर किंचितही विश्वास करू शकत नाही.

71 आणि त्याचप्रमाणे बरेच लोकं मंडळीमध्ये आहेत. त्यांना ठाऊक नाही त्यांचे वडील कोण आहेत, त्यांना ठाऊक नाही त्यांची आई कोण आहे. एकच गोष्ट त्यांना माहित आहे की ते एकतर प्रेसबटेरिअन, मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, किंवा पेंटेकॉस्टल, किंवा असे काहीतरी आहेत. त्यांना माहित नाही के ते कुठून आले आहेत. आणि एक जुनं गाढव, तुम्ही त्यांच्यावर ओरडू शकता जितके होईल तितके त्यांच्यावर ओरडा, आणि तो केवळ उभा राहून आणि मोठे कान बाहेर काढून केवळ बघत राहील. तुम्ही संपूर्ण रात्र त्यांना प्रचार करू शकता आणि ते आतमध्ये आले त्यापेक्षा किंचितही जास्त त्यांना बाहेर जाताना माहित नसेल. आता हे पूर्ण बरोबर आहे. मी उर्मट होऊ इच्छित नाही, पण मला तुम्हाला सत्य सांगायचे आहे.

72 पण एक गोष्ट आहे जी ते करू शकतात, ते चांगले कार्यकारी आहेत. ओह, ते केवळ काम, काम, काम, काम करतात. ते माझ्या ध्यानात आर्मेनियाम लोकांचा समूह आणतात जे नेहमी स्वर्गीय मार्गात जाण्यासाठी कार्यरत आहेत. हे बरोबर आहे, एक खेचर. ओह, द लेडीज एड सोसायटी, आणि कोंबडीच्या मांसाचे जेवण, प्रचारकांचा पगार. “आणि आम्हाला ह्या कृत्यासाठी, हे नृत्य करणे गरजेचे आहे.” आणि ते केवळ काम, काम, काम, काम, काम, काम, काम आहे. आणि ते, ते कशासाठी काम करत आहेत?

73 त्यांना विचारा, “तुम्ही विश्वास ठेवल्यानंतर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?”

74 ते त्यांचे कान बाहेर काढतील, आणि त्यांना माहित नाही की ते कोणाच्या मालकीचे आहेत, “तुम्हाला काय सांगायचे आहे? हे सर्व कोठून? पवित्र आत्मा म्हणजे तुम्हाला काय सांगायचे आहे? मी त्याविषयी कधीच ऐकले नाही. ओह, नक्कीच तू एक प्रकारचा धर्मवेडा असावा.” पाहिले, त्यांना माहित नाही त्यांचे वडील कोण किंवा त्यांची आई कोण. आणि तुम्ही जे काही करता त्यामध्ये तुम्हाला त्यांना पिटावे लागते, *इथे* पिटावे आणि *तिथे* पिटावे, आणि *इथे* पिटावे आणि *तिथे* पिटावे. हे बरोबर आहे, एक जुने खेचर.

75 पण मी तुम्हाला सांगतो, तुम्हाला एका खऱ्या उत्तम जातीच्या घोड्याबरोबर तसे करायला लागत नाही. त्याला केवळ एक चाबकाचा फटका मारा आणि भावा तो पळू लागेल. त्याला माहित आहे तो काय करत आहे. ओह, उत्तम जातीच्या घोडयाला चालविण्यात किती चांगले वाटते! त्याला असे बोलण्यास किती चांगले वाटते, “चल, मुला.” ओह, तुम्हाला गच्च पकडायला लागते नाहीतर तो तुमचे पादत्राणे हवेत उडवेल.

76 एका उत्तम प्रतीच्या खिस्ती मनुष्याचेही असेच आहे. हाल्लेलुया! “तुम्ही पवित्र आत्म्याचा स्वीकार करा. तुम्ही प्रत्येकजण पश्चाताप करा आणि तुमच्या पापांच्या

क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घ्या.” गेले, शक्य तितक्या जलद ते पाण्याकडे गेले. त्यांना पवित्र आत्मा मिळत नाही तोपर्यंत ते रात्र आणि दिवस विश्रांती घेऊ शकत नाहीत.का? तुम्हाला माहित आहे की एका ख्रिस्ती व्यक्तीला माहित आहे त्याचे वडील कोण होते. पाहिले, जन्मासाठी दोन व्यक्तींची गरज असते. हे बरोबर आहे, वडील आणि आई. खेचराला माहित नाही वडील कोणता आणि आई कोणती. पण आम्हाला माहित आहे की वडील आणि आई कोण होते कारण आमचा जन्म देवाच्या लिखित वचनाने झाला आणि आत्म्याने निश्चित केला गेला. पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी म्हटले, “जर, तुम्ही प्रत्येकजणांनी पश्चाताप करून, तुमच्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घेतला, तर तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान मिळेल.”

77 आणि, भावा, एक खरा नव्याने जन्मलेला ख्रिस्ती, (अरे, बापरे) त्याचा आत्मा, ज्यावेळी त्याला वचन मिळते, त्याचवेळी तो पवित्र आत्मा स्वीकारतो. नंतर त्याला काहीही विचारा! त्याला माहित आहे तो कुठे उभा आहे. “तुम्ही दैवी आरोग्य ह्यावर विश्वास करता का?”

“आमेन!”

“तुम्ही दुसर्यांदा येणे ह्यावर विश्वास करता का?”

“आमेन!”

78 एका खेचराला हे विचारा. तो धार्मिक खेचर, “हु, मला माहित नाही. डॉक्टर जोन्सने एकदा सांगितले होते…” हु! तेथे शौलाच्या मागोमाग चालतात. पाहिले? “ओह, त्यांना माहित नाही. बरे, मी तुला सांगतो, माझी मंडळी ह्याबद्दल निश्चित नाहीये.”

79 ओह, भावा, परंतु नवीन–जन्म पावलेले पुरुष व स्त्री, प्रभू येशूच्या येण्यासबंधी पूर्णपणे निश्चित आहेत, त्यांना पवित्र आत्मा मिळाल्याची तेवढीच खात्री आहे जितकी पवित्र आत्मा दिला जाणार ह्याबद्दल आहे.

80 आता, येशूने म्हटले…त्या विहिरीवरील स्त्रीने, “आम्ही ह्या डोंगरावर उपासना करतो, आणि यहुदी यरुशलेमेत उपासना करतात.”

81 त्याने म्हटले, “बाई, माझे शब्द ऐक! अशी वेळ येत आहे, आणि आता आली आहे, जेव्हा पिता त्यांना शोधतो जे त्याची उपासना आत्म्यात व खरेपणात करतील.”

82 “तुझे वचन हेच सत्य आहे.” आणि प्रत्येक मनुष्य जो बायबल वाचतो आणि बायबलमध्ये दिलेल्या प्रत्येक वचनावर विश्वास करतो, आणि त्यामध्ये दिलेल्या सूचना पाळतो, आणि जो पवित्र आत्मा त्यांनी स्वीकारला तोच तोही स्वीकारतो, त्यांनी स्वीकारला त्याचप्रकारे स्वीकारतो, त्यांना जे परिणाम मिळाले तेच त्यालाही मिळतात, तेच सामर्थ्य जे त्यांना मिळाले होते जेव्हा त्यांनी स्वीकारला होता, त्याला माहित आहे त्याचे वडील आणि आई कोण होते. त्याला माहित आहे तो येशू ख्रिस्ताच्या रक्तामध्ये धुतला आहे, आत्म्याने जन्मला आहे, देवाच्या तेलाने भरला आहे. तो कुठे उभा आहे हे त्याला माहित आहे. निश्चितपणे! तो कनानामध्ये आहे. त्याला माहित आहे तो कुठून आला आहे. खऱ्या खिस्ती व्यक्तीच्या बाबतीत असेच आहे. त्याला विचारा, “तू विश्वास ठेवल्यानंतर तुला पवित्र आत्मा मिळाला आहे का?”

“आमेन, भावा!”

83 एके दिवशी ब्याण्णव वर्षांची एक वृद्ध संत तिच्या ऐंशी वर्षीय पाळकांशी बोलत असताना, मी तिला विचारले, “आजी?”

शक्य तितक्या तेजस्वीपणे, ती म्हणाली, “होय माझ्या मुला.”

84 मी म्हटले, "तू पवित्र आत्मा स्वीकारून किती वेळ झाला आहे?"

ती म्हणाली, "देवाचा महिमा होवो! जवळ–जवळ साठ वर्षांपूर्वी मला तो मिळाला आहे."

85 आता, जर ती खेचर असती, तर ती म्हणाली असती, "आता, एक मिनिट थांब, माझ्यावर शिंपडून मला निश्चित केले होते जेव्हा मी...अरे खरोखरच, आणि त्यांनी मला चर्चमध्ये नेले आणि *अमुकअमुका*कडून मी पत्र घेतले." ओह, दया होवो! त्यांना हेही ठाऊक नाही की ते कोणाच्या मालकीचे आहेत.

86 पण तिला ठाऊक आहे तिचा जेष्ठत्वाचा हक्क कुठून आला. जेव्हा तो देण्यात आला तेव्हा ती तिथे होती. तिचा जन्म पाण्याने व आत्म्याने झाला होता. तिला माहित आहे, आणि पाण्याच्या स्नानाद्वारे वचनाने धुतले जाण्याने, ती वचनाचा स्वीकार करते.

87 आता पाहा हे कसे उद्देशून म्हटले आहे, "जे येशूख्रिस्तामध्ये आहेत त्यांना." पौल, आता, लक्षात ठेवा...मी खूप वेळ घेत आहे, पण मी ह्या अध्यायातुन जाणार नाही. पण मी घाई करीन...तुम्हाला हे आवडते का? ओह, आपण कोठे आहोत त्यासंबंधी हे आपल्याला सांगते, पण केवळ एका रात्रीत हे आपल्याला समजणार नाही. आपल्याला एक किंवा दोन महिने रोज रात्री लागतील ह्यांतील प्रत्येक शब्द समजून घेण्यासाठी. मागे इतिहासामध्ये जाऊन तुमच्यापुढे हे आणावे लागेल, आणि तुम्हाला दाखवावे लागेल की हे सत्य आहे. आता मला ते वचन लवकर पुन्हा एकदा वाचू द्या.

*इफिस येथील पवित्र जन व (संयोजक) ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वास ठेवणारे ह्यांस (मनुष्याच्या इच्छेनुसार नाही तर) देवाच्या इच्छेनुसार झालेला ख्रिस्त येशूचा प्रेषित पौल ह्याच्याकडून;*

88 म्हणजे, "ते बाहेर बोलावलेले असून, वेगळे केलेले आहेत, आणि आता पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा पावून, येशू ख्रिस्तामध्ये आहेत. माझ्या प्रियांनो, मी हे पत्र तुम्हाला उद्देशून लिहीत आहे." ओह, मला पौल आता या क्षणी त्यांच्याबरोबर असताना दिसत आहे, ओह, किती आनंदी! त्याला बिचाऱ्या म्हाताऱ्या प्रेषिताचे डोके त्यांनी तिथे कापून वेगळे केले. मी त्या जागी गेलो होतो जेथे त्यांनी त्याचे डोके कापून वेगळे केले. ओह, पण त्याचे डोके आता त्या नवीन शरीरावर आहे आणि ते पुन्हा कधीही वेगळे केले जाऊ शकत नाही. आणि ह्या क्षणी तो तिथे त्यांच्याबरोबर उभा आहे, तोच प्रेषित ज्याने हे लिहिले. आणि म्हटले, "तुम्ही जे येशू ख्रिस्तामध्ये आहा! एका आत्म्याने आपण सर्व ह्या एका शरीरामध्ये बाप्तिस्मा घेतला आहे." आता पाहा.

*देव आपला पिता आणि...प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून तुम्हाला कृपा व शांति असो.*

*आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यावादित असो, ज्याने आपल्याला आशीर्वादित केले आहे सर्व...*

ओह, चार्ली तू ते ऐकत आहेस काय?

*...आपल्याला सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आशीर्वादित केले आहे...*

89 केवळ काही प्रेषितांना नाही, आणि काहींना ह्याला, तर त्याने आपल्याला सर्व आत्मिक आशीर्वादाने आशिर्वादीत केले आहे. जो पवित्र आत्मा जो पेंटेकोस्टच्या दिवशी उतरला तोच पवित्र आत्मा आजच्या रात्री इथे उपस्थित आहे. तोच पवित्र आत्मा ज्यामुळे मरीया ओरडु लागली व अन्य भाषेत बोलु लागली, आणि खूप अदभुत वेळ घालवून

आनंद करू लागली, आणि सर्व गोष्टी ज्या तिने केल्या, तोच पवित्र आत्मा आजच्या रात्री इथे आहे. तोच पवित्र आत्मा ज्याने पौलाला त्या जुन्या जहाजावर, जे पूर्णपणे पाणी भरून बुडू लागले आहे असे दिसत होते, आणि चौदा दिवस आणि रात्री, चंद्र नाही किंवा तारे नाही. त्याने त्यावर बघितले आणि प्रत्येक लाटेवर सैतान होता, त्याच्यावर दृष्टी करत, आणि स्वतःचे दात खात, आणि म्हणाला, "मी तुला आता बुडवितो, म्हाताऱ्या मुला. तू आता माझ्याकडे आहेस."

90 आणि जेव्हा पौल थोडीशी प्रार्थना करण्यास खाली गेला, तेथे एक दूत उभा राहून, म्हणाला, "भिऊ नको, पौला. ह्या जुन्या जहाजाचा विनाश एका बेटावर होणार आहे. जा आणि तुझे भोजन घे, आता सर्व ठीक आहे."

91 त्याच्या छोट्या बाहूंवर त्या साखळ्या घेऊन ओढत ओढत, तो बाहेर आला, आणि म्हणाला, "तुम्ही चांगले धैर्य धरा मनुष्यांनो, कारण देव, ज्या देवाचा मी सेवक आहे, त्याचा दूत, माझ्या बाजूला उभा राहून म्हणाला, 'पौला, भिऊ नको.'" तोच पवित्र आत्मा आज ह्या रात्री इथे आहे, तोच देवाचा आत्मा, आपल्याला त्याच आत्मिक आशिर्वादांनी आपली सेवा करीत आहे.

*...स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आशीर्वादित केले...*

92 ओह, आपण इथे अजून एक मिनिट थांबूया. "स्वर्गीय स्थानांमध्ये." आता, केवळ बाहेर कुठेही नव्हे तर स्वर्गीय स्थानांमध्ये. आपण "स्वर्गीय," स्थानांमध्ये एकत्र आलो आहोत, ह्याचा अर्थ एका विश्वासणाऱ्याची जागा आहे. आणि मी जर प्रार्थना केली आहे, तुम्ही प्रार्थना केली आहे, किंवा मंडळीने प्रार्थना केली आहे आणि आम्ही संदेशासाठी तयार आहोत आणि आम्ही संत जणांमध्ये बोलावलेले असे जोडले गेले आहोत, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा झालेले, देवाच्या आत्म्याने भरलेले, निवडलेले असे आणि स्वर्गीय स्थानात बसलेले आम्ही आमच्या जीवांमध्ये स्वर्गीय स्थानात आहोत. आपल्या आत्म्यानी आपल्याला स्वर्गीय वातावरणात आणले आहे! ओह भावा! तेथे तुम्ही आहा, एका स्वर्गीय वातावरणात! ओह, आजच्या रात्री काय होऊ शकते, आजच्या रात्री काय होऊ शकते जर आपण इथे स्वर्गीय वातावरणात बसले असू, आणि पवित्र आत्मा प्रत्येक हृदयाला स्पर्श करीत आहे, जे नवचैतन्याने येशू ख्रिस्तामध्ये नवीन उत्पत्ती आहे? सर्व पापं रक्ताखाली, परिपूर्ण उपासनेत, आणि आपले हात देवाकडे वर करून आणि आपली हृदये वर उचलून, येशू ख्रिस्ताबरोबर स्वर्गीय स्थानांत बसले असून, स्वर्गीय स्थानांत एकत्र उपासना करीत आहोत.

93 काय तुम्ही कधी स्वर्गीय स्थानांत बसले आहात? मी तोपर्यंत बसलो आहे जोपर्यंत मी देवाकडे रडेन व म्हणेन, "देवा मला इथून कधीच जाऊ देऊ नको." केवळ ख्रिस्ताबरोबर स्वर्गीय स्थानांमध्ये!

94 आपल्याला कशाने आशिर्वादीत केले आहे? दैवी आरोग्य, पूर्वज्ञान, प्रगटीकरण, दृष्टांत, सामर्थे, अन्य भाषेत बोलणे, अर्थ सांगणे, ज्ञान, शहाणपण, सर्व स्वर्गीय दानं, आणि अवर्णनीय असा आनंद आणि पूर्ण महिमा, प्रत्येक हृद्य आत्म्याने भरलेले, एकत्र चालत, स्वर्गीय स्थानांत एकत्र बसलेले, आपल्यामध्ये एकही दुष्ट विचार नाही, एकही सिगरेट ओढणे नाही, एकही छोटे वस्त्र नाही, एकही *हे*, *ते* किंवा *काही* नाही, एकही दुष्ट विचार नाही, कोणाकडेही एकमेकांविरुद्ध काहीच नाही, सर्वजण प्रेमात आणि एकोप्यात बोलतात, सर्वजण एकमताने एका जागी, "मग स्वर्गातून अचानक सामर्थ्यशाली व धावत्या हवेप्रमाणे एक आवाज येईल." तेथे तुम्ही आहा, "सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला आशीर्वादित केले आहे."

95 मग कदाचित पवित्र आत्मा कोणा एकावर उतरेल, व म्हणेल, “**प्रभू परमेश्वर असे म्हणतो**. अमुक एका जागी जा व अमुक एक गोष्ट कर.” पाहा *ते* तसेच्या तसे होईल. [भाऊ ब्रॅन्हम त्यांच्या बोटांनी आवाज करतात—संपा.] पाहिले? “**प्रभू असे म्हणतो**. अमुक एका जागी जा व अमुक एक गोष्ट कर.” पहा ते तसेच्या तसे होईल. [भाऊ ब्रॅन्हम त्यांच्या बोटांनी आवाज करतात.]

96 “स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आशीर्वादित केले.” पाहा!

*ज्याप्रमाणे* त्याने *आपल्याला निवडून घेतले...*

97 आपण त्याला निवडले का, कि त्याने आपल्याला निवडले? त्याने आपल्याला निवडले, कधी? ज्या रात्री आपण त्याला स्वीकारले तेव्हा? निवडले!

*त्याप्रमाणे जसे त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला त्याच्यामध्ये निवडून घेतले, अशासाठी* की *आपण त्याच्या समक्षतेत पवित्र...निर्दोष असे...* (*संप्रदायामध्ये?*)...*प्रेमामध्ये असावे:*

98 देवाने आपल्याला कधी निवडले? ज्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे, देवाने तुम्हाला कधी निवडले? त्याने तुम्हाला कधी निवडले? जगाच्या स्थापनेपूर्वी. त्याच्या दूरदृष्टीने त्याने तुम्हाला अगोदरच पाहिले आणि जाणले की तुम्ही त्याच्यावर प्रेम कराल. आणि जगाच्या स्थापणेअगोदर, त्याने तुम्हाला निवडले, आणि येशूला पाठविले की त्याने तुमच्या पापांसाठी विनंती करावी, आणि तुम्हाला त्याच्याबरोबर समेट करण्यासाठी व त्याच्यावर प्रेम करण्यासाठी बोलवावे. ओह, इच्छा होते की आपल्याकडे थोडया जास्त मिनिटांचा वेळ हवा होता.

99 आपण थोडेही पुढे जाण्याअगोदर मला, मागे उत्पत्ती 1:26 मध्ये येउ द्या. मी ते बुधवारी घेईन. जेव्हा देवाने मनुष्य बनविला...त्याने मनुष्य बनविण्याअगोदर स्वतःला “एल,” इ–एल; इ–एल–एच, “एलाह,” “एलोहिम” असे संबोधले. इब्री भाषेमध्ये ह्या शब्दाचा अर्थ, “स्व–अस्तित्व,” असा आहे, पूर्णपणे त्याच्याद्वारे. त्याच्या अगोदर काहीच अस्तित्वात नव्हते, तो केवळ एकटाच अस्तित्वात होता, स्व–अस्तित्व असलेला एक! एल, एला, एलोहिम, म्हणजे, “सर्व–पूर्ण, सर्वशक्तीशाली, महान, स्व–अस्तित्व असलेला एक.” ओह!

100 पण उत्पत्ती 2 मध्ये जेव्हा त्याने मनुष्य घडविला, तो म्हणाला, “मी आहे,” वाय–ए–एच–यू, जे–यू–वी–यू–एच, *येहु*, “यहोवा.” याचा अर्थ काय होता? “मी एक स्व–अस्तिव असलेला आहे ज्याने स्वतःपासून काढून काहीतरी बनविले आहे, जो माझा पुत्र, किंवा एक तात्पुरते, किंवा एक तात्पुरती हौस, किंवा माझे छोटे स्वरूप आहे.” देवाला गौरव! का? त्याने मनुष्याला दिले...*यहोवा* म्हणजे, “असे की त्याने मनुष्याला तात्पुरते देव होण्याची संधी दिली.” कारण तो पिता आहे, देव, आणि त्याने मनुष्याला तात्पुरता देव असे बनविले, मग तो आता केवळ स्व–अस्तित्वात नाही, तो त्याच्या कुटुंबाबरोबर अस्तित्वात आहे. एलाह, एलाह, एलोहिम. आता, आता तो यहोवा आहे. *यहोवा* म्हणजे, “एक जो त्याच्या कुटुंबाबरोबर अस्तित्वात आहे.” आता, देवाने मनुष्याला सर्व पृथ्वीवर प्रभुत्व करण्यासाठी बनविले, त्याची सत्ता होती. आणि पृथ्वीवर मनुष्याची सत्ता होती. काय हे वचनात आहे? आणि मग जर ती त्याची सत्ता आहे, तर तो पृथ्वीवरचा देव आहे. तो बोलत असे व तसेच होई. तो *हे* बोलत असे, आणि तसेच होई. ओह! तेथे तो आहे, देव, यहोवा, जो पूर्वी स्व–अस्तित्व म्हणून अस्तित्वात होता, परंतु आता, त्याच्या कुटुंबाबरोबर अस्तित्वात होता, त्याची मुले त्याच्याबरोबर होती. तेथे तुम्ही आहा.

101 आता, हे वाचा. आपण बुधवारी रात्री ह्यामध्ये बघू जेव्हा आपल्याकडे जास्त वेळ आहे. आपण अजून केवळ पंधरा मिनिटे आणि आपण...मला वाटले मी ह्यातून एका विशिष्ट जागी येऊ शकेन जेथे आपल्याला पवित्र आत्म्याच्या अभिवाचनाने शिक्कामोर्तब केले आहे, परंतु आपल्याला तेथे येता येणार नाही. ठीक आहे.

102 आता, आपल्याला देवाचे सेवक होण्यासाठी कधी बोलावले होते? ऑर्मन नेव्हील ह्याला देवाचा सेवक होण्यासाठी कधी बोलावले होते? अरे बापरे! इथे मी लटपटतो. मी तुम्हाला सांगतो, आपण थोडे वचन पाहूया. तुम्ही 1 पेत्र 1:20 मध्ये या. आणि, पॅट, प्रकटीकरण 17:8 काढ. आणि मी प्रकटीकरण 13 काढतो. आता आम्हाला इथे ऐकले पाहिजे, तुम्हाला जाणायचे आहे की देवाने तुम्हाला ख्रिस्ती होण्यासाठी कधी बोलाविले. ओह, मला हे आवडते. "मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने जगेल." ठीक आहे, भाऊ नेविल, तुझ्याकडे एक पेत्र 1:20 आहे. [भाऊ नेविल म्हणतात, "1:20."—संपा.] बरे, 1:19 आणि 1:20 वाच. हे ऐका. ["1:19 आणि 20."] होय. [भाऊ नेविल पेत्राच्या पहिल्या पत्रातून 1:19–20 वाचतात.]

*तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो ख्रिस्त त्याच्या मूल्यवान रक्ताने:*

*ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी तुम्हांसाठी प्रगट झाला.*

103 त्याला कधी पूर्वीच नेमले होते? जगाच्या स्थापनेपूर्वी. भाऊ पॅट, माझ्यासाठी प्रकटीकरण 17:8 वाच. [भाऊ पॅट प्रकटीकरण 17:8 वाचतात—संपा.]:

*जे श्वापद तू पाहिले ते होते आणि नाही; ते अथांग डोहातून वर येणार आहे व नाशाप्रत जाणार आहे. जगाच्या स्थापनेपासून ज्याचे नाव जीवनाच्या पुस्तकांत लिहिले, नाही अशा पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांना, ते श्वापद होते, नाही, तरी हजर आहे असे पाहून आश्चर्य वाटले.*

104 कोण भुलविले जाणार आहेत? जसा शौल होता, तशाप्रकारच्या त्या धार्मिक मनुष्याकडून कोण भुलविले जाणार? ते इतके परिपूर्ण व धूर्त होते कि शक्य झाल्यास ते कोणाला भुलविल? त्याच इ–...[मंडळी म्हणते, "निवडलेल्यांना"—संपा.] जर... ["शक्य झाले."] जर शक्य झाले तर. ठीक आहे, प्रकटीकरण 13:8, मला तुमच्यासाठी वाचू दया.

*ज्या कोणाची नावे जगाच्या स्थापनेपूर्वी वधलेल्या कोकऱ्याजवळील जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेली* नाहीत *असे पृथ्वीवर राहणारे सर्वजण त्या श्वापदाला नमन करितील.*

105 आपली नावे कोकराच्या जीवनाच्या पुस्तकात कधी टाकण्यात आली? जगाच्या स्थापनेपूर्वी जेव्हा कोकरा वधला गेला. जेव्हा देव यहोवा होता, एल, एला, एलोहिम, स्व–अस्तित्व असलेला. एका महान मोठ्या हिऱ्याप्रमाणे, आणि तो त्याशिवाय दुसरं काही असू शकत नव्हता, पण ह्या हिऱ्यामध्ये त्याचा गुणविशेष तारणारा असा होता. ह्या गुणविशेषांत, त्याच्यामध्ये एक आरोग्य देणारा होता. बरे, तेथे वाचविण्यासाठी काहीच नव्हते आणि बरे करण्यासाठीही काहीच नव्हते, पण त्याच्या गुणविशेषांनी ते तयार केले. तर मग, जगाच्या स्थापनेपूर्वी त्याला त्याच्या इथल्या महान चित्राविषयी माहीत होते, आणि त्याला माहित होते की, तो तारणारा असा येईल, आणि तो येईल आणि हाडामांसाचा बनून आमच्यामध्ये वस्ती करील, आणि त्याला माहित होते की त्याला बसणाऱ्या फाटक्यांनी आपल्याला आरोग्य दिले जाईल, म्हणून जगाच्या स्थापनेपूर्वी त्याने एक कोकरा त्याच्या पुस्तकावर वधला आणि तुमचे नाव, जगाच्या स्थापनेपूर्वी त्या पुस्तकात लिहिले. ओह!

106 हे लक्षपूर्वक ऐका! पूर्वनियुक्ती ही मागे पूर्वज्ञानाकडे पाहते, म्हणजे निवड. निवड मागे पूर्वज्ञानाकडे पाहते, आणि पूर्वनियुक्ती ही अंतिम ठिकाणाकडे पाहते. हे विसरू नका, की निवड मागे अशी पाहते, हे पाहा, "मी एक धतुरा होतो. माझा जन्म पापामध्ये झाला, अन्यायामध्ये वाढलो, जगामध्ये खोटे बोलत आलो, पाप्यांमध्ये जन्मलो. वडील आणि आई आणि माझे संपूर्ण कुटुंब पापी होते. मी एक छोटा धतुरा होतो. परंतु अचानक मी एक गव्हाचा दाणा बनलो. हे कसे झाले?" हे, हे काय आहे? निवड. देवाने जगाच्या स्थापनेपूर्वी अशी निवड केली होती की एक छोटा धतुरा गव्हाचा दाणा बनेल. "आता मला माहित आहे की मी गव्हाचा दाणा आहे, कारण मी वाचलो आहे, ते मी कसे करू शकतो?" मागे पाहा व जाणा की त्याने पूर्वीच नियुक्ती केली होती. पूर्वज्ञानाने त्याने पाहिले होते की मी त्याच्यावर प्रेम करीन, म्हणून त्याने आपल्या पुत्राद्वारे प्रायश्चित्त केले की मी कणसातून गव्हाचा दाणा बनावा. "आता, मी आता कुठे आहे?" मी वाचलो आहे, मी देवाच्या कृपेमध्ये चालत आहे. "पूर्वनियुक्ती ही कशाकडे पाहते?" अंतिम ठिकाणाकडे. "तो मला कुठे घेऊन जाईल, आणि मी कुठे जात आहे?" आमेन. त्याने तुम्हाला घेतले आहे. तेथे तुम्ही आहा.

107 आता थोडे अजून पुढे वाचूया आणि थोड्याच वेळात आपण बंद करूया.

> *त्याप्रमाणे जसे त्याने...जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला त्याच्यामध्ये* निवडून *घेतले, अशासाठी* की *आपण त्याच्या समक्षतेत पवित्र...निर्दोष असे, प्रेमामध्ये असावे:*
>
> *त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच* नेमिले*.*

108 त्याने काय केले? त्याने, पूर्वज्ञानाने, आपल्याला अगोदरच पहिले, हे जाणत असताना की तो एक मुक्तिदाता, स्व–अस्तित्व असलेला आहे. तेथे देवदूत किंवा काहीही नव्हते; केवळ देव, एला, एलोहीम, एक स्व–अस्तित्व असलेला, त्याच्या एकट्या व्यतिरिक्त काहीही नव्हते. परंतु त्याच्यामध्ये एक मुक्तिदाता होता. असे काहीच नव्हते जे हरवले होते, बरे, मग, तो काय मुक्त करील? हे माहित असताना, त्याला माहित होते की त्याच्यातील हा चांगला गुणविशेष त्याचांतून काहीतरी तयार करील जे तो पुढे जाऊन मुक्त करू शकेल. आणि जेव्हा ते झाले, त्याच्या पूर्वज्ञानाने, त्याने पुढे पाहिले आणि जो कोणी त्याचा स्वीकार करणार त्या प्रत्येकाला पहिले. आणि हे करताना, तो म्हणाला, "त्याला वाचविण्यासाठी, एकाच मार्गाने मी हे करू शकेन आणि तो म्हणजे, मी स्वतः खाली जाऊन रक्तमांसाचे बनून, मनुष्याचे पाप माझ्यावर घेईन, आणि त्याच्यासाठी प्राण देईन की जेणेकरून माझी उपासना केली जाईल," कारण तो देव आहे, उपासना केली जावी असा.

109 नंतर तो खाली आला आणि स्वत:वर घेतले. आणि त्याने जेव्हा असे केले, त्याने असे अशासाठी केले की त्याला तुम्हाला वाचविता यावे, तुम्ही जे वाचू इच्छिता. मला काय म्हणायचे आहे ते तुम्ही पाहता काय? ज्याला सर्व गोष्टी माहित होत्या त्या अनंत देवाने, आपल्या पूर्वज्ञानाने, कोकरा पहिला, आणि त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी, कोकरा वधला, आणि त्याने तुमचे नाव वधलेल्या कोकराच्या पुस्तकात लिहिले. आणि त्याने सैतानाचे कपट पाहिले, की तो काय करणार आहे. म्हणून त्याने तुमचे नाव त्यावर टाकले. आणि त्याने म्हटले, ख्रिस्तविरोधक हा इतका धार्मिक असेल, इतका चांगला असेल, इतकी सुरेख व्यक्ती, इतका चलाख मनुष्य, इतका धार्मिक मनुष्य असेल की शक्य झाल्यास तो निवडलेल्यास फसवील. परंतु हे अशक्य आहे कारण त्यांची नावे जगाच्या स्थापनेपूर्वी,

पूर्वनियोजित केली होती. निवडीद्वारे त्याने त्यांना निवडले, आणि पुर्वनियुक्तीद्वारे त्यांना माहित आहे ते कुठे जात आहेत. तेथे तुम्ही आहा.

110 आता, ह्यावर कोण संशय करू शकेल? हेच पौलाने सांगितले. हे पौलाचे वचन आहे. हे पौलाचे लिखाण आहे. त्याच्या मंडळीला त्याने हेच शिकविले. जगाच्या स्थापनेपूर्वी, मंडळीची जागा. तुम्हाला तयार करण्यासाठी, देव जेव्हा त्याच्या प्रसुतीवेदनेत होता, तुम्ही काय करणार आहा हे ठाऊक असताना, त्याने तुम्हाला, एक गृहिणी, एक शेतकरी, एक प्रचारक, एक संदेष्टा, एक *हा* किंवा एक *तो*, असे स्वतःच्या शरीरात स्थानापन्न केले. मग जेव्हा आपण, पवित्रीकरणाने, लसुणाचा देश इजिप्त येथून बाहेर आलो, आणि वचनदत्त देशात बाप्तिस्मा घेतला...कारण पवित्र आत्मा हे देवाचे अभिवचन आहे. इफिसकरांस 4:30, सांगते, “देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; ज्याच्या योगे तुम्ही तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत मुद्रित झाला आहा.” मग देवाने, त्याची मंडळी पुर्वनियुक्त केली असताना म्हणाला, “आणि सर्व लोकं, दहा लाखवेळा, दहा लाख इतके लोकं, अतिशय धर्मिक असतील आणि फसविले जातील.” जे फसविले जाणार नाहीत ते केवळ तेच असतील जे वचनदत्त देशात आले आहेत, ज्यांची नावे जगाच्या स्थापनेपूर्वी, कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात घातली गेली, आणि ते वचनदत्त देशात आले असून तेथे आनंदात आहेत.

111 अनेक लोक घाबरतात की ते मजेदार वागतील. अनेक लोक घाबरतात की पवित्र आत्मा तुम्हाला असे काहीतरी करायला लावील की तुम्हाला—तुम्हाला, लोकांची लाज वाटेल. अनेक लोक घाबरतात की ते रडतील, आणि त्यांचा प्रियकर त्यांना रडताना पाहिल, किंवा आई, किंवा शेजारी, किंवा तुमचा बॉस तुम्हाला पाहील.

112 बंद करण्यापूर्वी, मला तुम्हाला एका मनुष्याविषयी सांगु दया. दावीद नावाचा एक मनुष्य होता, आणि जेव्हा देवाचा कोश पलीष्ट्यांच्या देशात होता, आणि तो कोश खेचत पलीकडे आणला, आणि एक म्हातारा बैल तो कोश खेचत होता, आणि जेव्हा दाविदाने कोश येताना पाहिले, त्याच्या अंगावर केवळ एक छोटा झगा होता, तो धावत तेथे गेला, त्याने त्याचे पाय हवेत उडविले, आणि त्याभोवती उड्या मारू लागला, आणि नाचू लागला, आणि उड्या मारू लागला आणि नाचू लागला. आणि तो, इस्राएलचा राजा! आणि त्याच्या पत्नीने खिडकीतून बाहेर पाहिले आणि तिला दिसले की तो खूप विचित्र वागत आहे, तिने त्याला तुच्छ मानले. का, तिने म्हटले असेल, “तो मूर्ख! तिथे बघा त्याच्यावर, तो कसा वागत आहे, त्याचे पाय हवेत उडवत, आणि सभोवती उड्या मारत आणि असा वागत आहे. का, बहुतेक तो वेडावला असावा!” आणि त्या रात्री, जेव्हा तो आत आला, तिने अशा शब्दांत म्हटले, “तू मला लज्जास्पद केलेस. तू, एक राजा, माझा पती, तेथे बाहेर का तसे करत होता, आणि तसा वागत होता!”

113 दावीद म्हणाला, “उद्या मी त्याहून अधिक चांगले करीन. होय महाशय!” तो म्हणाला, “तुला माहित नाही काय, मी प्रभूसाठी नाचत होतो?” त्याने पार केले! तो वचनदत्त देशात होता. त्याने सर्व स्व-शैली आणि जगाची घाण गमावली होती. कोश त्याच्या स्वतःच्या नगरात येत आहे त्यामुळे तो खूप आनंदी होता.

114 आणि, ओह, मी तुम्हाला सांगतो, काही लोकं पवित्र आत्मा स्वीकारण्यास घाबरतात, ते भितात की ते कुठे अन्य भाषेत बोलतील. ते घाबरतात, की कोणीतरी म्हणेल, “आता तोही त्या अन्य भाषा बोलणाऱ्यांपैकी एक आहे.” ते चर्चमध्ये येऊन येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घेण्यास भितात, कारण त्याची त्यांना लाज वाटते. ऊ! ओह!

115 कोणीतरी म्हटले, मला माझ्या ध्वनीफिती मागे घ्यावा लागतील, कारण मी येशू ख्रिस्ताच्या नावातील बाप्तीस्म्याबद्दल प्रचार केला होता. मी त्या मागे घेणार नाही. मी अधिक बनवतोय! ते बरोबर आहे, की, अधिक बनवतोय! ते बायबल आहे. जर आपण जे काल केले ते त्यांना आवडत नसेल, तर आपण उद्या काय करणार ते पाहा! तेच करणे आहे, पाहा, केवळ पुढे जात राहा. त्याला कुठेच अंत नाही, कारण ते प्रभूपासून आहे. तो देव आहे.

116 तुम्हाला माहित आहे देवाने काय केले? देवाने स्वर्गातून खाली पाहिले, त्याने म्हटले, "दावीद, तू माझ्या मनासारखा एक मनुष्य आहेस." दाविदाला लाज वाटत नव्हती. तो प्रभूचा सेवक होता. त्याचे प्रभूवर प्रेम होते. आणि तो इतका आनंदी, इतका उल्लासित झाला, की त्याने मनुष्याच्या प्रतिष्ठेची पर्वा केली नाही.

117 तुम्हीं पाहा, जसे मी आजच्या सकाळी माझ्या संदेशात म्हटले, आपण इतके भित्रे आहोत, की आपल्याला शिकविण्यासाठी एखादा शौल हवा आहे, आपल्याला एखाद्या सेमिनारीतला एखादा शौल हवा आहे ज्याने आपल्याला, आपण आपला धर्म कसा पाळावा आणि कसे करावे हे सांगावे. हे यार्देनेच्या दुसऱ्या बाजूला आहे. ह्या बाजूला पवित्र आत्मा नेतृत्व करतो. इथे तुम्ही त्या घाणीतून बाहेर आहा. इथे तुम्ही, ते काय विचार करतात ह्याची पर्वा करीत नाही. इथे तुम्ही मृत आहा, आणि तुमचे जीवन ख्रिस्तामध्ये पूर्णपणे लपले आहे...आणि पवित्र आत्म्याने मुद्रित आहा. तुम्ही पर्वा करत नाही. तुम्ही कनानात राहत आहा. तुम्ही उत्तम प्रतीचे धान्य असे उभे राहू शकता. तुम्ही येशू ख्रिस्तामध्ये नवीन उत्पत्ती आहा. तुम्ही वचनदत्त देशासाठी बांधलेले आहा.

118 मला आठवते, पलीकडे उभा असलेला भाऊ कॉलिन्स, अंदाजे तीस वर्षांअगोदर, जेव्हा हे चर्च बांधले गेले नव्हते. ती एक तंबूमधील सभा होती, इथे कोपऱ्यात, ती माझी पहिली सभा होती. मी हेच शुभवर्तमान प्रचार करीत होतो, हीच गोष्ट, ख्रिस्ताची अनाकलनीय संपत्ती, येशू ख्रिस्ताच्या नावामधील पाण्याचा बाप्तिस्मा, प्रत्येक वचन खरे आहे असा विश्वास करणे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, दैवी आरोग्य, देवाची सामर्थ्ये, तसेच जसे मी आता प्रचार करतो, त्याहून एक इंचदेखील वेगळे नाही. देवाने मला त्यांतील काही गोष्टीचे जास्त प्रकटीकरण दिले आहे, आणि मग, जसे तो मला प्रगट करतो, मी ते पुढे आणतो. जे काही आहे त्यांतून तो काहीच काढत नाही, तो केवळ त्यात भर घालत राहतो.

119 मी तेथे खाली उभा होतो जेव्हा जवळजवळ पाचशे लोकं किनाऱ्यापाशी उभे होते, आणि गात होते, "यार्देनेच्या वादळी किनाऱ्यावर मी उभा आहे, आणि माझे आशावादी डोळे कनानाच्या चांगल्या आणि आनंदी प्रदेशाकडे लागले आहेत, जेथे माझ्या मालकीच्या वस्तू आहेत. केव्हा मी त्या हितकारक किनाऱ्याकडे पोहोचेन आणि कायमचा आशीर्वादित होईन, केव्हा मी पोहोचेन आणि माझ्या पित्याच्या...आणि कायमचा विश्रांती पावेन?" जेव्हा ते गात होते, तेव्हा मी एका मुलाला नदीमध्ये, त्याला प्रभू येशूच्या नावामध्ये, बाप्तिस्मा देण्यासाठी घेऊन जात होतो. मी म्हणालो, "पित्या, मी ह्या मुलाला, त्याच्या कबुलीप्रमाणे, इथे आणलेले असताना..." त्यावेळी मी केवळ एक तरुण मुलगा होतो, माझ्याकडे घरी त्यावेळची छायाचित्रे आहेत. मी म्हणालो, "प्रभू, जेव्हा मी त्याला त्याच्या कबुलीप्रमाणे, देवाचा पुत्र येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये पाण्याने बाप्तिस्मा देत आहे, तू त्याला पवित्र आत्म्याने भर." आणि त्याच वेळी, कशाने तरी भोवरा पडला, आणि ते भोवऱ्यातून खाली आले, तो तेजस्वी आणि सकाळचा तारा तेथे उभा राहिला. तेथे तो प्रकाश उभा राहिला जो तुम्हाला त्या चित्रामध्ये दिसतो. तेथे तो उभा राहिला.

120 तो जगभर गेला, वर कॅनडा आणि सभोवती. त्यांनी म्हटले, "एक बॅप्टिस्ट सेवक बाप्तिस्मा देत असताना, एक रहस्यमय प्रकाश त्याच्यावर दिसला."

121 काही दिवसांपूर्वी, जेव्हा डॉक्टर लामसा माझ्याकडे आले, आणि त्यांना ह्याविषयी काहीच माहित नव्हते, आणि त्यांनी एक छायाचित्र आणले, जे भावाकडे मिळाले होते ते आता त्यांच्याजवळ आहे. तुझ्याकडे ते चित्र आहे काय? तुझ्याकडे ते बायबल आहे काय, तेथे पडलेले, ते तुझ्या पुस्तकामध्ये आहे का? ठीक आहे. तेथे देवाचे, जुने प्राचीन इब्री चिन्हाचे एक चित्र होते, अगदी तेच जे इयोबाच्या दिवसांत होते, बायबल लिहिले गेले त्यापूर्वी. देव त्याच्या तीन गुणविशेषांमध्ये, तीन देव नव्हे. एक देव तीन गुणविशेषांमध्ये. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा, तीन कार्यालये ज्यामध्ये देव कार्य करतो. तीन देव नव्हे, तीन गुणविशेष! आणि तेथे ते होते. जेव्हा तो उत्तम मनुष्य, डॉक्टर लामसा, लामसा बायबलचे भाषांतर, जेव्हा त्या सकाळी तो म्हणाला. जेव्हा मी त्यांना म्हटले की, मी म्हटले—मी म्हटले, "ते चिन्ह काय आहे?"

122 ते म्हणाले, "ते इब्रीमध्ये, देवाचे प्राचीन चिन्ह आहे. देव, एक देव तीन गुणविशेषांमध्ये."

मी म्हटले, "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा असे का?"

123 ते थांबले, आणि त्यांनी त्यांचे कॉफीचे कप खाली ठेवले, त्यांनी माझ्याकडे पहिले. जीन, मी विश्वास करतो तू तेथे होतास, लिओ. त्यांनी म्हटले, "तुम्ही ह्यावर विश्वास करता काय?"

मी म्हटले, "माझ्या पूर्ण हृदयापासून."

124 ते म्हणाले, "भाऊ ब्रॅन्हम, कालच्या रात्री, तुमच्या सभेत उभा असताना, मला ती पारख मिळाली. मी ती अगोदर कधीही, माझा देश अमेरिका येथे बघितली नाही." त्यांनी म्हटले, "ह्या अमेरिकी लोकाना बायबलसुद्धा ठाऊक नाही. एकच गोष्ट त्यांना माहित आहे ती म्हणजे त्यांचे संप्रदाय. ते कोठे उभे आहेत हेही त्यांना माहित नाही." म्हणाले, "त्यांना काहीच माहित नाही." त्यांनी म्हटले, "पण जेव्हा मी कालच्या रात्री तेथे उभा राहिलो," म्हणाले, "मी म्हणालो…" आता, भाऊ जीन, मी हे केवळ आदर आणि प्रेमाने हे म्हणत आहे. ते म्हणाले, "मी मनात म्हटले, 'तो नक्कीच संदेष्टा असावा.' पण जेव्हा मी पाहतो की, तू विश्वास करतो की, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा हे तीन देव नाहीत, ते गुणविशेष आहेत, तेव्हा मला माहित आहे की तू देवाचा एक संदेष्टा आहेस, नाहीतर हे तुला अशा प्रकारे प्रगट केले गेले नसते." ते म्हणाले, "ते एक परिपूर्ण चिन्ह आहे." म्हणाले, "मी कधीच…" म्हणाले, "तू वननेस मधला नाहीस काय?"

125 मी म्हटले, "नाही श्रीमान. मी वननेस मधला नाही. मी देव हा सर्वसमर्थ देव आहे ह्यावर विश्वास करतो, आणि तीनही गुणविशेष हे फक्त तीन कार्यालये आहेत ज्यांमध्ये तो एक देव राहतो."

126 ते म्हणाले, "तुझे हृदय आशीर्वादित असो!" त्यांनी म्हटले, "एके दिवशी तू त्यासाठी तुझे रक्त पृथ्वीवर सांडशील, पण," म्हणाले, "संदेष्ट्ये नेहमी त्यांच्या कार्यासाठी मरतात."

127 आणि मी म्हटले, "जर हे प्रभूला संतोषकारक असेल, तर मग तसेच असो." लामसा बायबलचे भाषांतर.

128 ओह, हे खरोखर पूर्ण सत्य आहे. मी किती वेळा, जसे शमुवेलाने सांगितले, त्यांनी शौलाची निवड करण्याअगोदर, जसे मी ह्या मंडळीला सांगतो, "तुम्ही बाहेर जाऊन

एखाद्या संप्रदायामध्ये सामील होऊन एखाद्या प्रकारच्या धर्मामध्ये बांधले जाण्यागोदर, तुम्ही पवित्र आत्म्याला तुमची आघाडी का करू देत नाही?" तुम्ही तुमच्या संप्रदायाला विसरून, आणि देवाला तुमचा नेता म्हणून स्वीकारून, त्याला तुम्हाला आशीर्वादित का करू देत नाही. आता, मी सांगत नाही की तुम्ही कोणत्या सांप्रदायिक मंडळीमध्ये सामील होऊ नका, तुम्ही, तुम्हाला पाहिजे त्या एकाला जाऊन मिळा. हे तुमच्यावर आहे. पण मी तुम्हाला एक व्यक्तिगतरित्या सांगत आहे, तुम्ही पवित्र आत्म्याला तुमचे नेतृत्व करू दया. तुम्ही बायबल वाचा. आणि जे बायबल करण्यास सांगते, ते तुम्ही करा. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

129 आणि आता मी खूप वेळ थांबलो. मला माहित नाही, इथे कोणी असे आहेत ज्यांना प्रार्थनेच्या रांगेत येऊन त्यांच्यासाठी प्रार्थना करायची आहे. आणि असतील तर ते त्यांचे हात वर करतील का? फक्त एक, दोन, तीन. ठीक आहे. मग तुमची इच्छा असेल तर तुम्ही ह्या वेळेला पुढे येऊन इथे उभे राहा, आणि—आणि आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करू. आणि नंतर आपण...तुम्ही एवढ्यात जावे असे मी इच्छित नाही. आपण—आपण बंद करण्याअगोदर मला अधिकृतपणे अजून काहीतरी करायचे आहे.

130 किती जणांना गलातीकरांस पत्राचा अभ्यास आवडतो...ओह, माझं मत इफिसकरांस पत्राचा? आता, बुधवारी रात्री आपण शिक्क्यांवर अभ्यास करणार आहोत. आणि नंतर पुढच्या शनिवारी आपण मंडळीला स्थानापन्न करणे ह्यावर बघणार आहोत. ओह जर...कदाचित आपण त्यावर ह्या बुधवारी रात्री बघणार आहोत, तुम्ही जे जेफ मधील लोकं आहात तुमच्यासाठी. मंडळीला जिकडे तिचे स्थान आहे तिथे स्थानापन्न करणे, प्रत्येकजणाला. आपल्याला कसे दत्तकपणाने बोलाविले गेले आहे. देवाने आपल्याला पुत्र असे दत्तक घेतले आहे, आपण जन्मापासून पुत्र आहोत. पवित्र आत्म्याद्वारे दत्तक घेऊन स्थानापन्न केलेले असे. पाहा! जेव्हा त्यांनी ती नदी पार केली, तेव्हा ते प्रत्येकजण इब्री होते, परंतु यहोशवाने ती जागा वाटली आणि प्रत्येकाला, ज्याच्या त्याच्या आईने, जसे त्यांच्या जन्माच्या वेळी, पवित्र आत्म्याच्या सांगण्यावरून जिथे सांगितले, त्याप्रमाणे ती दिली.

131 याकोबाकडे पाहा जेव्हा तो मरणास टेकला होता, एक संदेष्टा, अंध झालेला, आपले पाय बिछान्यात वर करून म्हणाला, "याकोबाच्या मुलांनो पुढे या आणि तुम्ही तुमच्या शेवटल्या दिवसात कुठे असाल ते मी तुम्हाला सांगतो." गौरव! ओह, मला माहित आहे कदाचित मी विचित्र वाटेन. लोकं विचित्र वाटतील. पण, ओह, जर तुम्हाला केवळ हे माहित असते ती—ती खात्री, हृदयामध्ये जळणे! "पुढे या आणि मी तुम्हाला सांगतो तुम्ही शेवटल्या दिवसांत कुठे असाल." आणि मी तेच वचन घेऊन आणि यहुदी लोकं आज कुठे बसले आहेत ह्याचा नकाशा घेऊन तुम्हाला हे सिद्ध करू शकेन की ते अगदी बरोबर त्याच जागी आहेत जिथे याकोबाने सांगितले होते की ते शेवटल्या दिवसात असतील. आणि सात मे 1946 च्या रात्रीअगोदर ते पूर्वी कधीच त्या जागी नव्हते, तीच रात्र जेव्हा देवदूत मला तेथे वर दिसला आणि त्याने मला ह्या मिशन बद्दल सांगितले. आणि मी तुम्हाला हे दाखवू शकतो की, जेव्हा ते ह्या नवीन प्रदेशात आले, तेव्हा ते अगदी बरोबर त्याच जागी आदळले जेथे याकोबाने म्हटले होते की ते बसतील.आणि तेथेच ते आज बसले आहेत. ओह, ओह, अरे, बापरे, अरे बापरे! आपण घराच्या एक दिवस अजून जवळ आहोत, बस्स.

132 तुम्ही प्रिय लोकांनो, तुम्ही आजारी आहात, नाहीतर तुम्ही इथे केवळ उभे राहण्यासाठी उभे नसते. मी तुमचा भाऊ आहे. मला देवाने आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्याची कामगिरी सोपविली आहे. असे नाही...माझ्याकडे बरे करण्याचे सामर्थ्य

आहे, माझ्याकडे नाही. पण माझ्याकडे प्रार्थनेचे सामर्थ्य आहे. जसे मी आज सकाळी म्हटले, दाविदाकडे गोफणाऐवजी दुसरे काहीच नव्हते, पण तो म्हणाला, “मला माहित आहे, देवाच्या सामर्थ्याने हे कार्य करील.” पाहिले? माझ्याकडे केवळ तुमच्याकरिता अर्पिण्यासाठी छोटीशी प्रार्थना आहे, आणि तुमच्यावर ठेवण्यासाठी माझे हात आहेत, पण मला माहित आहे की देवावरील विश्वास काय करील ते. त्याने दुसऱ्यांसाठी केले आहे, तो तुमच्यासाठी करील. तुम्ही जसे वर इथे जवळ येत आहा, तुम्ही ह्याचा विश्वास करा.

133 आता, मी विचार करतो, हे अधिक कार्यक्षम व्हावे म्हणून मी माझ्या भावाला इथे पुढे बोलावून त्यांना तेलाने अभिषेक करायला सांगितले तर. भाऊ नेविल, तुम्ही पुढे याल का? मी मंडळीला विनंती करतो की तुम्ही प्रार्थनेमध्ये आपली मस्तके झुकवा.

134 आता लक्षात घ्या, मागील आठवड्यात मी जेव्हा त्या जुन्या एरंडेल तेलामुळे आजारी असताना, जर कोणी माझ्याकडे येऊन माझ्यावर हात ठेवले असते तर मी काहीही देण्यास तयार झालो असतो. जर माझ्याकडे कोणीतरी आले असते, ज्याला देवाने आशीर्वाद देऊन मदत केली आहे, तर मी त्याची दाद दिली असती. जसे मला त्यावेळी वाटत होते तसे तुम्हा सर्वांना आता वाटत आहे. जसे मला त्यावेळी, कोणीतरी माझ्यासाठी करावे असे वाटत होते, तसे मी तुमच्यासाठी आता करावे असे तुम्हाला वाटत आहे. देव माफ करो जर मी कधी ह्या कामासाठी टाळाटाळ केली असेल. मला नेहमी, जरी मी थकलेला असलो, जरी माझी दमछाक झाली असेल, जरी मी जेमतेम एक पाय हालवू शकेन एवढेच त्राण माझ्यात असतील, तरी मला जाउ द्या, कारण मी तुम्हा प्रत्येकजणाला पुन्हा तिथल्या त्या प्रदेशामध्ये भेटणार आहे.

135 मग तुम्ही म्हाताऱ्या स्त्रिया, म्हातारे मनुष्ये, तुटलेले, केस पांढरे होऊन गळत आहेत, आणि जसे एखादे गुलाब, जे एकदा कळीतून फुलले होते आणि आता आपल्या पाकळ्या गाळत आहे, तसेच तुम्हीही तुकड्यांमध्ये पडत आहा, नाही का? हे बरोबर आहे. केवळ...आणि एकच गोष्ट जिच्यासाठी तुम्हाला एकत्र राहायचे आहे ती म्हणजे देवाच्या महिमेसाठी प्रकाशण्यासाठी. तर आता जेव्हा शत्रूने तुम्हाला पकडले आहे आणि थकवले आहे, मी देवाच्या गोफणासहित येत आहे, एका विश्वासासहित, एका दानासहित जे देवाने मला दिले आहे. हे बघा इथे जे मी सांगितले कि जेणेकरून तुम्हाला हे समजावे. मी सांगितले, “जर पेत्र मध्ये आला असता, किंवा त्यांच्यातील कोणीतरी.” तुम्हाला माझ्यासाठी प्रार्थना करायची नाही. फक्त याप्रमाणे या आणि म्हणा, जसे ह्या स्त्रीने म्हटले, म्हणाली, “तू *अमुक-अमुक* बहिण आहेस का?” तुझे नाव काय आहे? बहिण हॉवर्ड, म्हणाली, “तू बहिण हॉवर्ड आहे, तू एक विश्वासी आहेस, बहिण हॉवर्ड? तुम्ही विश्वासी आहात. तुम्ही विश्वासी आहात, तर मग तुम्ही पाहा तुम्हाला सर्व मुक्तीच्या आशीर्वादाचे अधिकार आहेत.” नंतर मी म्हणतो, “बहिण हॉवर्ड, सर्वकाही ठीक होईल, आणि निघून गेले आहे.” मी म्हणालो, “मी किंचाळीन, मी आरोळी मारीन.” मी म्हटले, “प्रभू असेच व्हायला हवे, असेच व्हायला हवे.”

136 आणि मी विचार केला, “बरे, लोकं तोच विचार करतात जेव्हा मी येऊन त्यांच्यासाठी प्रार्थना करतो.” तर मग तेच आहे. तुम्हाला समजते मला काय सांगायचे आहे?

137 आणि बऱ्याचदा, मी उभा राहून लोकांना घेऊन म्हटले आहे, “ओह, मौल्यवान बहिणी, तू ह्यावर विश्वास करशील का? ओह, तू ह्यावर विश्वास करशील का?” “प्रभू, ओह, देवा त्यांना ह्यावर विश्वास करण्यास लाव. त्यांना ह्यावर विश्वास करू दे.” “ओह, कृपा करून तुम्ही आता ह्याचा स्वीकार कराल का?” ते आता नाही. मी ते पार केले आहे. मी ते पार करून दूर आलो आहे.

मी केवळ म्हणतो, “बहीण हॉवर्ड तू विश्वासणारी आहेस का?”

“होय मी आहे.”

138 “ठीक आहे, बहीण हॉवर्ड, जर तू विश्वासणारी आहेस तर जे काही देवाचे आहे त्या सगळ्याची तू वारीस आहेस.” आणि केवळ तिचा हात घेऊन. पाहा, मी त्यावर विश्वास करतो. माझे हात तिच्यावर ठेऊन मी बहीण हॉवर्डशी संपर्क साधतो. येशू ख्रिस्ताने कधीच म्हटले नाही, “त्यांच्यासाठी प्रार्थना करा,” त्याने म्हटले, “फक्त तुमचे हात त्यांच्यावर ठेवा.” मग एवढेच पुरे, ती बरी झाली आहे. ती, बहीण हॉवर्ड, म्हणू शकते, “सर्वकाही ठीक होईल.” मग तुम्ही घरी जाऊन बरे होऊ शकता. देव तुम्हाला आशिर्वादीत करो.

139 तू बहीण...[ती बहीण म्हणते, “हॅम्पटन”—संपा.] बहीण हॅम्पटन, तू एक विश्वासणारी आहेस, नाही का? [“मी आहे.”] त्याने दिलेल्या सर्वांची तू वारीस आहेस. देव तुझ्या बरोबर असो, बहीण हॅम्पटन. आता, तू घरी जा आणि बरी हो. येशू ख्रिस्त तुला बरे करील.

140 तू बहीण...[ती भाऊ बोलते, “स्लॉटर”—संपा.] स्लॉटर. तेच...तू तीच आहेस जिच्यासाठी आम्ही इस्पितळात प्रार्थना केली. मग, तू एक विश्वासणारी आहेस, बहिण स्लॉटर, आम्ही जे काही मागतो त्याची एक वारीस. बहिण स्लॉटर, तू जे मागितले आहे ते तुला मिळो आणि ठीक हो. देव ते तुला देईल.

141 भाऊ जीन, देव तुला देईल असा तू विश्वास करतो का? [भाऊ जीन म्हणतो, “होय श्रीमान, होय श्रीमान.”—संपा.] आणि जीन, तू जे मागितले बरोबर तेच देव तुला देवो!...?...

142 मी तुला ओळखतो. [ती बहिण बोलते—संपा.] बहिणी, तू एक विश्वासणारी आहेस. [“अरे, हो.”] मी तुला ओळखतो. ते तेथे तुझे पती आहेत. ते तेच आहेत ज्यांच्याकरिता मी त्या दिवशी दूरध्वनीवर प्रार्थना केली. मी नेहमी त्याची आठवण ठेवतो. तुलसा येथे सभेसाठी जाऊ शकला नाही. सभेमध्ये येऊ शकला नाही. आणि प्रभुने त्याला बरे केले, आणि सभेमध्ये पाठविले. तू दुसऱ्या कोणाचीतरी प्रतिनिधी म्हणून उभी आहेस. [“माझा पुतण्या.”] बहिणी, ही किती ख्रिस्ती गोष्ट आहे! पाहिले? तोसुद्धा प्रतिनिधी होता. तो आपल्या सर्वांसाठी उभा राहिला. तू एक विश्वासणारी आहेस आणि देवाने वचन दिलेल्या प्रत्येक गोष्टीवर तुझा अधिकार आहे. मी त्याचा सेवक आहे. आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने तू जे काही मागतेस ते मी तुला देतो. [“मी ह्यावर विश्वास करतो.”]

143 ये, भाऊ नील. देव तुला आशीर्वाद देवो. तुझ्यासाठी तो खूपच चांगला राहिला आहे. तू एक विश्वासणारा आहे. मला माहित आहे तू आहेस. मी विश्वास करतो की तू जे काही मागशील ते सर्व देव तुला देईल, कारण तू एक विश्वासणारा आहेस. आणि त्याचा सेवक म्हणून, तुला, माझ्या भावा, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, मी तुला तुझे हृदय इच्छिते ते देतो. जा आणि त्याचा स्वीकार कर. देव तुला आशीर्वाद देवो.

144 बहिण ब्रूस, मी तुला ओळखतो. ती छोटी परिचारिका, जिने माझ्या पाठीत रगडले, ती तुला ओळखत होती. ती तेथली आहे, मोटेल जेजे, ट्विन ट्विन जेजे असेच काही, त्याच्याजवळची. तू दुसऱ्यासाठी उभी राहतेस. आणि आजच्या रात्री, तुझ्या वडिलांसाठी, तुझी काय इच्छा आहे? [बहिण ब्रूस म्हणते, “आजच्या रात्री, माझ्यासाठी.”—संपा.] आजच्या रात्री, तुझ्यासाठी. [बहिण ब्रूस पुन्हा बोलते.] मग, शत्रूने डॉक्टरच्या आटोक्यापलीकडे हिसका दिला आहे, पण मी गोफण घेऊन तुझ्यामागे येत आहे. आणि येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये मी गोफणेचा बाण थेट त्या खड्यावर मारतो जो मूत्रपिंडामध्ये अडथळा आणत आहे. तो तुला परत देवाकडे, त्याच्या घरामध्ये आणील.

आम्ही, येशू ख्रिस्ताच्या नावाने तुला मागितले आहे. आमेन.

145 श्रीमान तुम्ही ह्या मनुष्याचे वडील आहात काय? तुम्ही विश्वासाणारे आहात काय? [तो भाऊ बोलतो—संपा.] तुमच्या डाव्या बाजूला, खाली, एक अंतर्गळ आहे. श्रीमान, तुम्ही विश्वास करता काय देव तुम्हाला ते देईल, आणि त्याचा एक सेवक म्हणून?

146 प्रभू, ह्या हाताने कदाचित कठीण दिवसाचे काम केले असेल. इथे काहीतरी करण्यासाठी, एका उद्देशाने आला असेल. पित्या, त्यांच्या हृदयातील इच्छा पूर्ण कर, जसे आम्ही येशूच्या नावाने प्रार्थना करतो की तू करशील. आमेन.

147 संशय करू नका. तो अंतर्गळ तुम्हाला त्रास देणे थांबवेल, आणि तुम्ही एकदम ठीक व्हाल. देव तुम्हाला आशीर्वाद देवो भाऊ...?...

148 [एक बहिण म्हणते, "माझे डोके आणि गळा दुखतो. जेव्हा मी खोकते तेव्हा माझ्या फासळ्या दुखतात. मी गाऊ शकत नाही. मी काहीच करू शकत नाही. मी...?...आणि मी जास्त झोपू शकत नाही. काहीही करू शकत नाही."—संपा.] तू एक विश्वासणारी आहेस, नाही का? ["मी आहे. मी पवित्र आत्म्याने भरलेली आहे."] तू एक विश्वासणारी आहेस. ["मला माहित आहे देव आत वास करतो."] आणि ह्या सर्व आशीर्वादांची तू एक—तू एक वारस आहेस. ["मला माहित आहे. आणि मी विश्वास करते. भाऊ ब्रॅन्हम, मी तुमच्या प्रार्थनेमध्ये विश्वास करते. मी विश्वास करते की देव मला बरे करील. मी विश्वास करते की तो तुमच्या प्रार्थना ऐकतो."] आभारी.

149 पित्या, मी माझ्या ह्या बहिणीला, अग्नीखाली, लक्ष्याच्या मधोमध आणतो. आणि मी, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, तिला शत्रूच्या ताब्यातून, तुझ्याकडे परत आणतो. आमेन.

150 ते बरोबर ह्याच प्रकारे होईल. [ती बहिण म्हणते, "होय, भाऊ ब्रॅन्हम."—संपा.]

151 [एक बहिण म्हणते, "...?...माझे फुफ्फुस बंद होत आहे, आणि बंद पडले होते."—संपा.] फुफ्फुसाची शस्त्रक्रिया.

152 हे प्रभू, हि तरुण स्त्री इथे उभी असताना, जी अजूनही आपल्या तरुणाईत आहे, मी तिच्यासाठी प्रार्थना करतो. आणि एक फुफ्फुस जे बाहेर काढले जाईल आणि तिला आपले उरलेले आयुष्य, वाकावे लागेल. तू आमचा पिता आहेस, आणि मी प्रार्थनेच्या अग्नीचा नेम अगदी बरोबर तिच्यावर धरतो, अगदी सरळ त्या फुफ्फुसावर. मी हि प्रार्थना येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये पाठवितो. ती त्या फुफ्फुसावर आदळून ते बरे करो. येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये मी हे मागतो. आमेन.

153 तू बहिण...[ती बहिण म्हणते, "बहिण गिब्स."—संपा.] बहिण गिब्स. ["बरोबर डोक्यामध्ये, आणि त्यामुळे दुखाव होत आहे."] बरोबर. तुम्ही मस्तक माझ्यापासून दूर केले आहे. बहिण गिब्स, तू एक विश्वासणारी आहेस आणि देवाच्या सर्व कृपादानांची वारीस आहेस.

154 प्रभू, जसे तू दाविदाला त्याच्या पित्याची मेंढरे राखण्यासाठी एक गोफण दिले, त्याचप्रमाणे जे गोफण तू मला दिले आहे त्यासहित, मी तिला तुझ्याकडे आणतो. आणि जर शत्रू त्या मेंढरांच्या मागे आला, तो भीत नव्हता. तो ते छोटेसे गोफण घेऊन सरळ त्या सिंहाच्या आणि—आणि अस्वलाच्या मागे जाऊन ते मेंढरू परत आणि. हि एक विश्वासाची प्रार्थना आहे. तू मला सांगितले जर मी, "लोकांना विश्वास ठेवण्यास लावले आणि प्रामाणिक राहिलो." मी, आजच्या रात्री, बहिण जर्कला परत आणतो. मी तिला शत्रूच्या हातांतून हिसकावितो. ती तुझे मेंढरू आहे. मी, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, तिला पित्याच्या मेंढवाड्यात परत आणतो. आमेन.

155 [एक बहिण म्हणते, “बहिण लोवी.”—संपा.] बहिण लोवी. [“मला उच्च रक्तदाब आहे.”] उच्च रक्तदाब. आणि तू एक विश्वासणारी आहेस, हो का बहिण लोवी? सर्व कृपादानाची एक वारीस.

156 मग, पित्या, देवा, मी आजच्या रात्री ह्या प्रार्थनेचा हेतू, देवाचे ते गोफण म्हणून, बहिण लोविच्या उच्च रक्तदाबासाठी ठेवतो. आणि असे होवो की पुढच्या वेळी जेव्हा वैद्य तो रक्तदाब घेईल, तो तिच्यावर बघो आणि म्हणो, “तो आता ठीक आहे.” तिला माहित असेल ते कोणी केले. येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये मी हे तिला देतो. आमेन.

157 [एक भाऊ, भाऊ ब्रॅन्हम बरोबर बोलतो—संपा.] होय. मी इच्छा करतो की जर माझे वडील आजच्या रात्री येथे असते तर मी त्यांच्यासाठी आता ह्या क्षणी, प्रार्थना केली असती. मी तुझ्या वडिलांसाठीसुद्धा करीन. मला समजते.

158 स्वर्गीय पित्या, ज्या मनुष्याने ह्या मुलाचे पालन केले, असे की हा मुलगा केवळ त्याच्यामुळे आजच्या रात्री ह्या पृथ्वीवर आहे. आणि त्याचा स्वतःचा मुलगा इच्छा करतो की त्याचा पिता परत आणला जावा, जो पलीकडच्या जगात पापामध्ये आहे, मद्यपी. ओ प्रभू, विश्वासाने आणि सामर्थ्याने, आणि जे काही मी फेकू शकेन त्यासहित, मी हि छोटीशी गारगोटी, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये पाठवितो. ज्या सैतानाने पलीकडे त्या गोष्टीने त्याला पकडले आहे, त्याच्यावर मी ती गोफणाने मारतो. आणि तो त्याला सोडून जावो. आणि तो सुरक्षित मेंढवाड्यात येवो, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये. आमेन.

159 [एक भाऊ म्हणतो, “भाऊ ब्रॅन्हम, मला पवित्र आत्मा मिळावा म्हणून माझ्यासाठी प्रार्थना करा. मला पवित्र आत्मा स्वीकारायचा आहे. मला स्वीकारायलाच हवा. माझी अशी इच्छा आहे. मला पवित्र आत्मा मिळायलाच हवा.”] तो मिळविण्याची तुमची इच्छा आहे. तुम्हाला अशा प्रदेशात यावयाचे आहे जेथे सर्व आश्वासने आहेत. [“होय.”]

160 आणि आता, परमेश्वरा, हा मुलगा, दुसऱ्या बाजूला मुक्काम करून नदीच्या पलीकडे गेला आहे, आणि यार्देन भरलेली आहे. आणि त्याच्याकडे नदी पार करण्यासाठी कोणताही मार्ग नाही त्या मार्गाशिवाय जो तू बनवशिल, ज्याप्रमाणे तू यहोशवा आणि इस्त्राएल साठी मार्ग बनवला होतास. आणि, पित्या, मी तुझा सेवक म्हणून, तुझ्याकडे मागतो, हे देवा, आमच्या ह्या मौल्यवान भावाचा ह्या वचनदत्त देशात प्रवेश होऊ दे, हे वचन. असा की, त्या दुसऱ्या बाजूला, जेथे मी मागच्या एका रात्री गेलो होतो, मला विशेष अधिकार असू दे की मी त्याला घेऊन त्याच्या खांद्यावर हात टाकून सांगेन, “माझ्या मौल्यवान भावा.” हे कबुल कर, प्रभू. त्याला परमेश्वराचा आश्वासन दिलेला पवित्र आत्मा मिळो. आमेन

161 हे प्रभू माझ्या या दयाळू भावासाठी; हा हात जो माझ्यासाठी दयाळू राहिला आहे, आणि माझ्यासाठी काही गोष्टी केल्या आहेत, ज्या कधीही विदित करण्यात आल्या नाहीत. हा भाऊ विश्वास करतो. परंतु मधुमेह जो त्या शत्रूपासून आहे आणि जो ह्या मित्राला हिसकावण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि तो शत्रू विचार करतो की तो—तो या मुलाला हिसकावू शकतो. पण मी त्याच्या मागे येतोय. प्रभू, मी हा दगड पूर्ण विश्वासाने गोफणाने फेकून, तुझे स्वतःचे तुझ्याकडे परत आणण्यासाठी येतोय. येशू ख्रिस्ताच्या नावाने त्या मधुमेहावर मी आघात करतो!...?...माझ्या भावा. पित्या, तुझ्या मेंढरांना तुझ्या मेंढवाड्यात परत घेऊन ये, येशू ख्रिस्ताच्या नावात मागतो. आमेन

[बहिण बेल भाऊ ब्रॅन्हम बरोबर बोलतात—संपा.]

162 हे प्रभू, आमच्या भगिनीला ठाऊक आहे की हा स्थूलपणा, जसे वैद्य सांगतात, ही गोष्ट अशी आहे की जी जीव घेऊ शकते. विमा दिनदर्शिकेप्रमाणे, “प्रत्येक पौंड, स्थूलता,

एक वर्ष कमी करते," आणि हि भगिनी सन्मानाने व परमेश्वराच्या गौरवात जगू इच्छित आहे. आणि येथे कोणताच वैद्य असा नाही आहे जो हे करू शकतो, पित्या, परमेश्वरा. हे फक्त तुझ्या—तुझ्या हातात आहे. आणि भगिनी बेल यांचा खूप विश्वास आहे. आणि अशा संकटात तीने खूप दयाळूपणा आणि सामंजस्य दाखविले आहे, आणि अशा स्थितीत ती पुढे जात आहे.ती खूप अशा खोल संकटातून पार गेली आहे.मी तिच्यासाठी आज रात्री तुझ्याकडे येतो, प्रभु. तो जो शत्रू पलीकडे उभा आहे त्याच्याकडे मी तुझ्या नावाने येत आहे. साधेल तो अचूकपणा लक्ष्य करून.प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तो विश्वासाचा खडक त्या शत्रूच्या दिशेने फेकून देतो ज्याने तिला घेरले आहे. प्रभू त्याचे तुकडे करो, आणि त्याला तिच्यापासून हाकलून लावो आणि ती हिरव्या कुरणाप्रमाणे आणि संथ पाण्याप्रमाणे पुनः स्थापित होवो, ख्रिस्त येशूच्या नावाने मागतो. आमेन.

तुमच्या इच्छेप्रमाणे होईल, बहिण बेल. फक्त विश्वास धरा.

163 सीस्टर स्पेन्सर. [सी. स्पेन्सर म्हणते, "भाऊ, भाऊ बिल, मी परमेश्वरावर प्रतिदिन अधिक प्रेम करते. आणि मी गेली वीस वर्षे या स्थळी येते. आणि जवळजवळ माझ्यावर आलेल्या प्रत्येक परिस्थितीवर मला विजय मिळाला आहे. तुम्हाला या प्रत्येकाबद्दल माहित आहे, आणि…?…"—संपा.] मला नक्कीच माहित आहे भगिनी…?…["आणि त्याने मला भरपूर आशीर्वाद दिला आहे! आणि मी त्याच्यावर अधिक प्रेम करते. माझ्या आयुष्यातील प्रतिदिनी. मी जाणते माझे जीवन प्रभू मध्ये विस्मयकारक आहे."] मी विश्वास ठेवतो सी. स्पेन्सर. ["मी आनंदी आहे, आनंदी आहे! जर मला जो मिळाला आहे तो पवित्र आत्मा नाही तर मला त्याने दिलेल्या सर्व गोष्टींसाठी मी—मी अजूनही वेदीजवळ आहे. आणि मी ह्या वेदीवर मरणार आहे."] आमेन. ["येशू ख्रिस्ताबरोबर वेदीवर मरण्याच्या दरवाजाची मुठ मला तेथेच हवी होती."] आमेन. प्रभू ह्या भगिनीने मागितल्याप्रमाणे तू तिला दे…?…आमेन. ["आणि मी तुम्हाला सांगत आहे मी तुमच्याकडून काय इच्छित आहे. आणि ह्या मार्गावर, मी माझे पूर्ण कुटुंब माझ्याबरोबर घेऊन आले आहे. पण मला माझे पूर्ण कुटुंब हवेय, तुम्हाला हे ठाऊक आहे. माझ्या प्रेमळ व्यक्ती बचावल्या जावोत."] मी जाणतो. तुमची मुले, हे योग्य आहे. ["…?…आणि माझी मुले."] होय बाईसाहेब. ["आणि माझे घराणे."] होय, श्रीमान, मी…["मला असे वाटते कि ते सर्व बरे आहेत."] होय. ["तुम्ही आमच्यासाठी प्रार्थना केलीत."]

164 आपण सर्व बहिण स्पेन्सरशी परिचित आहोत, आणि जाणतो कि कशा प्रकारे ती आणि भाऊ जेस कठीण परिस्थितीत, कसे काय या चर्च मधून खाली येऊन पोहोचले आहेत. जेव्हा मी दुसऱ्या बाजूला पार करून जाईन, तेव्हा ते अशा प्रकारे धडपडत चालणार नाहीत. ते तरुण असतील. ओह! भाऊ जेस जर मी केवळ…?…तुला माहित आहे. आणि मग तुम्हा सर्वांना माहित आहे कसे, फक्त—फक्त त्या छोट्याशा पलीकडे…?…तू पुन्हा सुंदर मुलगी होशील आणि भाऊ जेस तरुण मुलगा. देवाने तुम्हाला वचन दिले आहे.

165 आता, लक्ष दे, मी तुला लहानशी शिकवण देऊ इच्छितो, हे विचारात घेऊन कि तू शेवटचा आहेस.

166 कारण, मला माहित आहे हे तुमचे छोटे मूल, चार्ली.तुम्ही त्याच्यासाठी प्रार्थना करू इच्छिता? [भाऊ चार्ली म्हणतात, "होय."—संपा.]

167 मी हि एक गोष्ट सांगू इच्छितो. तुम्ही कधी वचनामध्ये वाचलेले आहे जिथे पवित्र शास्त्र म्हणते? पॉल त्या रोमी अधिकाऱ्याला म्हणाला.

तुम्ही मला व्यवस्थितपणे ऐकू शकता का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा].

168 पॉल त्या रोमी अधिकाऱ्याला म्हणाला, जेव्हा त्याने तरवार उगारली, स्वतःचा जीव घेण्यासाठी, तेथे फिलिप्पात जेव्हा पॉल तुरुंगात होता.आणि भूमीकंपाने तुरुंग हादरला. तो म्हणाला, "प्रभू येशू ख्रिस्ता वर विश्वास ठेव, आणि तुझे आणि तुझ्या घराण्याचे तारण होईल." तुम्ही हे कधी ऐकले आहे का? [मंडळी "आमेन" म्हणते—संपा.] "तुझे आणि तुझ्या घराण्याचे." ["आमेन."] आता, ऐका. जर तुमच्याकडे स्वतःच्या तारणासाठी पुरेसा विश्वास आहे, तर तुमच्याकडे आपल्या घराण्याच्या तारणासाठी पुरेसा विश्वास नसावा का? ["आमेन."] परमेश्वर, कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते साध्य करील.

169 आणि, प्रभू मी सी.स्पेन्सर आणि भाऊ स्पेन्सर यांच्यासाठी प्रार्थना करतो, आजच्या रात्री, ते प्रत्येक लहान मुलं, ते आणि त्यांची मुले, त्या तेजस्वी, आनंदी प्रदेशात असोत जेथे कोणताही आजार नाही, किंवा वृद्धत्व नाही, दु:ख किंवा निराशा नाही, आणि इकडचे हे छोटेसे जीवन एखाद्या निघून गेलेल्या भयानक स्वप्नाप्रमाणे अंधुक होईल. प्रभू त्यांना तू हे बहाल कर, तिच्या सर्व मुलांना, आणि पतीला, आणि सर्व तिच्या प्रिय व्यक्तींना, आणि सर्व जे तिच्यावर प्रेम करतात, आणि ते सर्व ज्यांच्यावर ती प्रेम करते, ते सर्व तिच्याबरोबर असोत, येशूच्या नावात. आमेन.

170 [बहिण स्पेन्सर म्हणते, "आमेन. तुमचे आभारी."—संपा.] प्रभू तुम्हाला आशीर्वादित करो. ["मी लवकरच ब्याऐंशी वर्षाची होत आहे."] ब्याऐंशी वर्षाची. ["...?...या वयात इतर लोक खाटेला खिळतात. परंतु मी आजही स्वयंपाक, धुणीभांडी, आणि इस्त्री आणि घराची सफाई करते."] ज्याप्रमाणे जग मागे पडत आहे, भगिनी स्पेन्सर. ["अगदीच, मी नेहमीच खूप थकलेली असते. त्यांना ते समजेल...मी माझ्या आईला, सावत्र आईला खूप वर्षांपूर्वी विचारले, ती नव्वद वर्षाची होती, तुम्हाला कसे वाटते जेव्हा तुम्ही म्हातारे होता. ती म्हणाली 'रोज, कदाचित तुला नेहमी थकल्यासारखे वाटेल.' मी थकलीये."] छान, तुम्ही तर अगदी विसाव्यात जाण्यास तयार आहात, तुम्ही पहा. ["मला नेहमीच थकवा जाणवतोय. मला विश्रांतीची गरज आहे, मला ती हवे आहे."] होय, बाईसाहेब. ["आणि मला माझ्या गुडघ्यावर जाऊन परमेश्वरामध्ये विश्रांती घ्यायची आहे. प्रत्येक, प्रत्येक गोष्ट जी मला हवी आहे."] होय. फक्त त्याच्यावर विश्वास धरा, बहिण स्पेन्सर, आणि तुम्ही पार कराल. ["मला वेदीवर मरावयाचे आहे, ख्रिस्ताच्या नावात. तोच आहे ज्याला मला पहावयाचे आहे, जोपर्यन्त तो बोलावत आहे."] आणि तो म्हणाला...["मला ती प्रत्येक गोष्ट हवीये जी त्याने मला दिलेली आहे."] आणि मी तुमच्या बरोबर उभे असताना, ह्या रात्री मी निश्चितपणे सांगतो, भगिनि स्पेन्सर, प्रभूच्या दयेने मी तुम्हाला आणि जेसला पलीकडे प्रभूच्या मळ्यात पाहीन, तरुण आणि सदृढ. तुम्ही सर्व धावत असाल, हाका मारत असाल, "माझा भाऊ! माझा भाऊ!" ["होय."] मी तुम्हाला पाहीन.

तिच्या नसा.

171 पित्या, परमेश्वरा, हि मुलगी जी आजारी आहे, आणि औषधे तिच्यावर काम करीत नाहीत. तिची हि एक अडचण आहे. पण मी तिच्यासाठी तुझ्याकडे येतो प्रभू. मी तुझ्याकडे येतो पित्या. मी येतोय आणि मागतो कि मला मार्गदर्शन कर की मी त्यावर कसा मारा केला पाहीजे. त्याच्या पाठीला निशाणा करून, त्या आजारपणाला तू शून्यवत कर. येशू ख्रिस्ताच्या नावात प्रार्थना करतो कि, तो त्या उदासीनतेचे तुकडे करो आणि ह्या प्रभूच्या मेंढराला त्याच्या मळ्यात परत आणो. आमेन

ते व्हायलाच पाहिजे प्रिय भगिनी.

172 [एक भगिनी म्हणाली, "प्रार्थना करा. माझ्या सहा लेकरांसाठी मी मागते कि, परमेश्वर त्यांना बरे करो व वाचवो."—संपा.]

173 स्वर्गाच्या प्रभू, ती सहा लेकरे ज्यांच्यासाठी हि भगिनी मागते त्यांना वाचव. तिने ब्रदर डौल्टन यांच्या सुंदर मुलींची साक्ष ऐकली आहे.ती तिच्या सहा लेकरांसाठी मागते, बापा.तिच्या इछे प्रमाणे कर बापा. ते तिला अशा प्रदेशात भेटोत जेथे रात्र नाही, परंतु ते ख्रिस्ताच्या रक्तामधे सुरक्षित व त्याच्या कवचाखाली आहेत. आमेन.

तुम्ही इच्छिल्याप्रमाणे होवो भगिनी, हि माझी प्रार्थना आहे.

[एक बहिण भाऊ ब्रॅन्हम ह्यांच्याशी संवाद साधते—संपा.]

174 मी तुझ्यावर विश्वास करतो. क्वचितच काही आहे जे, ह्याला बरे करू शकते. ते काहीतरी देतात जे ह्यासारखे दिसते, ओह, काहीतरी औषध अस्तामीन सारखे दिसणारे. ते एक कोरतीसोन आहे, ते त्याला असे संबोधितात. ते, ते तुम्हाला जवळजवळ ठार मारते. पण पाहा. बघा, हा संधिवात एका सिंहासारखा आहे जो मेंढरू बळकावून आपल्या मार्गाला पळाला आहे. आता एक गोफण काय करील? अरे, बापरे! तिथे एक मोठा गर्जना करणारा सिंह मेंढरू पकडून आहे. आणि त्याला मेंढरू आवडते, म्हणून तो मेंढरू घेऊन पळाला आहे. पण दाविदाने गोफण घेतले आणि त्याच्या मागे गेला. पाहिले? आता बघा. त्याच्याकडे पाच दगड होते: एफ–ए–आय–टी–एच, तो स्वतः, आय–एन. त्याची गोफण *त्याच्या* हाती आहे: जे–इ–एस–आय–एस. येशू त्याला अचूक मारणारच. काहीतरी घडायलाच हवे. आपण, आजच्या रात्री, ह्या प्रार्थनेद्वारे त्या संधीवाताच्या मागे जाऊया. देव तुला ते देवो.

175 [एक बहिण भाऊ ब्रॅन्हम ह्यांच्याशी संवाद साधते—संपा.] तिला नावात बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे? ["नाही. नाही. ती असे म्हणाली नाही."] तिचा बाप्तिस्मा व्हावा असे तुम्ही इच्छिता? ["हि माझी इच्छा आहे कि तिचा बाप्तिस्मा व्हावा."] धन्यवाद, भगिनी. ह्यामुळे नाही कि तो खरा मार्ग आहे. ह्यामुळे की…आता, जर बायबलमध्ये असे असते की, "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा," मी—मी विश्वास ठेवला असता व मी त्याला धरून चाललो असतो, भगिनी. मला ह्याहून काही वेगळे हवे नसते. मला तसेच हवे असते. मला कशानेही…मी—मी त्याच्यासाठी जबाबदार असणार आहे, तुम्ही पहा. आणि मला तसेच सांगावे लागले असते, त्याप्रमाणेच अगदी ज्याप्रमाणे *ते* सांगितले जाते; कोणत्याही वेगळ्या प्रकारे नाही, परंतु प्रामाणिकपणे.

176 आणि, आता, बापा मी तिच्या प्रियजनांसाठी तूजकडे येतो. तिला संधीवात झालेला आहे, आणि येथे ती प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेऊ इच्छिते, कारण बाप्तिस्मा हा प्रवेशद्वार आहे. तो खुला दरवाजा आहे. येथेच यहोशवाने एक मार्ग उघडला जो वचनदत्त देशात पार करून जाण्यासाठी एक मार्ग ठरला. तेथे दोन किंवा तीन मार्ग नव्हते तर एकमेव मार्ग होता.

177 पेत्र, पवित्र आत्म्याच्या आगमनाच्या दिवशी, जेव्हा पहिली मंडळी स्थापन झाली, मार्ग दाखवून म्हणाला, "पश्चाताप करा आणि प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या." ते कुणीही त्या मार्गापासून चुकले नाही, त्या प्रत्येकाने वचनदत्त देशात प्रवेश केला.

178 त्यातील काही, जण पलीकडे जाऊ इच्छित होते, खाली, दूसऱ्या नदीच्या पात्रांतून, आणि पॉल त्यांना म्हणाला, "तुम्ही कोणाचा बाप्तिस्मा घेतला आहे? तुम्ही ओलांडून कुठे जात आहात?"

आणि ते म्हणाले, "खाली येथे, जेथे योहानाने पाहिले."

179 तो म्हणाला, “बरे, योहानाने फक्त वेळ आणि जागा यांच्यावर निर्देश केला.” आणि जेव्हा त्यांनी हे ऐकले, त्यांनी योग्य बाप्तिस्मा घेतला. आणि त्या पलीकडे जाऊन त्यांना पवित्र आत्मा मिळाला, छान.

180 प्रभू तो बाप्तिस्मा ह्या भगिनीला आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींना तू बहाल कर, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात मागतो. आमेन.

181 भाऊ लायल. [भाऊ लायल म्हणतात, “माझा विश्वास आहे कि तुम्ही योग्य प्रमुख आहेत, भाऊ ब्रॅन्हम.”—संपा.] ओह भाऊ! [“चालत आले...?...तुम्हाला आठवते जर तेथे स्वप्नात काही, काहीतरी आले...जर तुम्ही स्वप्न सांगाल, ते ठीक आहे. मलाही तेच पडले. जेथे तुम्हाला नेहमीच स्वप्न पडते. ठीक आहे...?...”] होय कधीतरी. [“होय.”] होय. मला हर्ष होतो...?...देव तुला आशीर्वादित करो. तू आपल्या अभिवाचनाच्या देशाच्या मार्गावर आहेस! कदाचित मी त्याविषयी म्हणेन.

182 तुमच्यातल्या कित्येकांना माहित आहे अगदी प्रभूंचे कार्य मला अभिषिक्त करण्या अगोदर, एक दिवस आम्ही तेथे मासेमारी करत होतो, खाली तेथे नदीवर अथवा सरोवरावर? आणि मी लहान मासळी पकडत होतो, तेव्हा पवित्र आत्मा माझ्यावर उतरला. तेथे एक...हा माणूस, जो यहोवा विटनेस संस्थेतला आहे, तो तेथे होता. त्याचा भाऊ, बँक्स वूड्स इथे कुठेतरी आहे. तो आत कुठेतरी आहे, जो माझा शेजारी आहे.

183 हा लायल आहे. आणि हे लोक यहोवा विटनेस ह्या संस्थेशी संलग्न होते. आणि ते म्हणाले एक दिवस जेव्हा आम्ही मासेमारी करत होतो तेव्हा ह्या मुलाने ख्रिस्ताचा स्वीकार केला, त्याला मी सांगिलते त्याच्या जीवनात जे काही होते. आणि जे—जे त्याच्या जीवनात घडले, आणि त्याबद्दल सर्व काही. जे त्याने आता काही वेळा अगोदर मला सांगितले, आणि त्याने आता ज्याला आपल्या जीवनातून बाहेर घालवून दिले, बरोबर आहे ते. जे काही होते ते. ते अगदी बरोबर आहे.त्याचे वडील एक—एक वाचक होते. काय त्याचे वडील येथे आपणात हजर आहेत, बिली? [कुणी म्हणाले, “माहित नाही.”—संपा.] आणि त्याने व त्याच्या पत्नीने, दोघांनी, बाप्तिस्मा घेतला, येशू ख्रिस्ताच्या नावाची साक्ष देण्यासाठी, येथे या तलावात. आणि हा माणूस माझ्या बरोबर होता, एक दिवस.

184 बँक्स, कुठे आहेस तू? आज तो येथे आहे का? [एक व्यक्ती म्हणाली, “मागे तिथे अगदी कोपऱ्यात तो आहे.”—संपा.] होय. मागे तेथे कोपऱ्यात तो आहे.

185 आणि आम्ही मासेमारी करत होतो. आणि भावा, माझ्या लहान मुलाने एक छोटे पिल्लू जीवे मारले. त्या लहान वयोवृद्ध मांजरीला काही पिल्ले होती, आणि त्याने त्यातल एक पिल्लू उचललं व खाली टाकले. मी विचार केला...मी म्हणालो, “प्रभू त्या छोट्या जीवाला जिवंत करील,” एक दिवस अगोदर. काय हे बरोबर आहे, लायल? [भाऊ लायल वूड म्हणतात, “होय.”—संपा.] आणि मी म्हणालो, “**परमेश्वर असे म्हणतो**.” आणि आम्ही संपूर्ण रात्र मासेमारी केली परंतु आमच्या हाती काहीच लागले नाही.

186 पुढच्या सकाळी आम्ही मासेमारी करत होतो, मागील एका लहान खाडीमध्ये, ब्लूगील नावाच्या छोट्या माशासाठी. हा एक लहान मासा आहे. आणि भाऊ लाएलकडे मोठी काठी होती. आणि त्याने ती पूर्ण, एका छोट्या ब्लूगीलला गिळू दिली, त्याच्याकडे मोठा गळ होता, त्याने तो बाहेर खेचेपर्यंत, तो मोठा गळ त्या छोट्या ब्लूगीलच्या पोटापर्यंत खाली गेला. आणि जेव्हा त्याने तो बाहेर ओढला, तेव्हा त्याला, तो मिळण्यासाठी, त्या ब्लूगीलच्या पोटांतून आतडी आणि सर्वकाही खेचावे लागले. आणि फक्त तो पूर्णपणे बाहेर खेचला कारण तो मोठा गळ ब्लूगीलच्या पोटात अडकला होता. आणि जेव्हा त्याने तो बाहेर काढला, त्याने तो खाली पाण्यात टाकला. आणि तो फक्त चार ते पाच वेळा

थरथर कापला आणि बस्स, कारण त्याची आतडी आणि श्वसनेंद्रिय त्याच्या तोंडातून बाहेर येऊन लटकत होती. आणि तो तेथे जवळजवळ अर्धा तास तरंगत होता, मागे झुडूपांमध्ये तरंगत होता.

187 आणि मी तेथे मासेमारी करीत होतो. आणि अचानक पवित्र आत्मा येऊन मला म्हणाला, "माशा बरोबर बोल."

188 मी म्हणालो, "लहान माशा, प्रभू येशू ख्रिस्त तुला तुझा जीव परत बहाल करो." आणि तो लहान मासा, जो पाण्यावर मृत पडला होता, त्याच्या बाजूने वळला, आणि गेला, बाहेर पाण्यामध्ये, तितक्याच वेगाने जितका तो जाऊ शकला.

189 भाऊ लायल आणि भाऊ वूड त्या ठिकाणी उपस्थित होते. भाऊ लायल म्हणाले, "भाऊ ब्रॅन्हम, ते माझ्यासाठी होते कारण मी त्या लहानाला म्हणालो…"

190 [भाऊ ब्रॅन्हम भाऊ लायल वूड ह्यांच्याबरोबर बोलतात—संपा.] आज रात्री, मी तुम्ही काय म्हणाला होता ते सांगू शकतो काय? [भाऊ लायल म्हणतात, "तुम्ही नक्कीच सांगू शकता, काही हरकत नाही, भाऊ ब्रॅन्हम."]

191 जेव्हा त्यांनी त्याच्यातून आतडी बाहेर खेचली तेव्हा ते सहजच म्हणाले, "छोट्या माश्या, तू तुझी जीवनातली शेवटची संधी हरवली," आणि त्याला बाहेर फेकले.

ते म्हणाले, "ते—ते माझ्यासाठी होते."

आणि मी म्हटले, "नाही, भाऊ लाएल. ते तसे नव्हते."

192 भाऊ बँक्स मागे बसले आहेत, ते म्हणाले, "ह्या जगात कितीतरी लोकं, कितीतरी हजारो लोकं असतील, ज्यांना, जेथे आपण ह्या क्षणी उभे आहोत तेथे उभे राहून देवाला खाली येवून अशा प्रकारे काहीतरी कामगिरी करताना बघण्यास आवडले असते!" दुसऱ्या शब्दांत, त्याला आवडते…

193 मी विश्वास करतो कि आम्हा सर्वांना, जसे पेत्राला वाटले, तसे वाटले, "इथे असणे किती चांगले आहे. मी इथे तीन मंडप बांधतो." पाहिले? ते बरोबर आहे.

194 आता, भाऊ लायल, तुम्ही पवित्र आत्म्याने आता अभिषिक्त आहात. तुम्ही इजिप्त सोडले आहे. लसुणाचे भांडे आणि जगातील घाण मागे राहिली आहे. तुम्ही आता यार्देनेच्या काठापाशी उभे आहा, अगदी ओलांडून पलीकडे. देव तुम्हाला पलीकडे नेवो; लायल.

195 सामर्थ्यशाली देवा, इथे तुझे पारितोषिक आहे. प्रभू, तो खरोखरच भीषण अशा अवस्थेत होता, परंतु माझे हृदय त्याच्यासाठी रडले. आमच्या प्रार्थनेने त्या गोठलेल्या हवेला पलीकडे घालवून लावले, आणि ज्या गोष्टीने त्याला पकडले होते ती त्याच्यापासून निघून गेली आहे. तिचा पूर्ण चुरा झाला आहे. आणि आता तो यार्देनेकडे चालत आहे. [भाऊ लाएल म्हणतात, "आभारी, येशू."—संपा.] त्याला वचनदत्त देशात घेऊन जा, प्रभू. ["होय प्रभू."] आणि त्याला त्या लोकांमध्ये शिक्कामोर्तब कर. ["होय, प्रभू."] कि जेणेकरून, त्या उत्कृष्ठ दिवशी जेव्हा आम्ही पलीकडे भेटू, मला त्याच्या आलिंगनाचा स्पर्श जाणून ओरडू दे, "माझ्या मौल्यवान भावा!" ["आमेन."] "मी त्याला ओळखतो." प्रभू, बँक्सलाहि त्याच्यासोबत आण, आई आणि वडील, आणि ते सर्व, बहिण, आणि ते संपूर्ण उत्तम कुटुंब; प्रभू तू आणशील का? प्रभू, आम्हा सर्वांची पलीकडे भेट होऊदे आणि ते प्रत्येकजण पवित्र आत्म्याने भरूदे. मी येशूच्या नावात प्रार्थना करतो. आमेन. ["आमेन"]

तुम्हाला ते मिळेल, भाऊ. देव तुम्हाला आशीर्वादित करो, भाऊ लायल.

196 [कोणीतरी म्हणते, "भाऊ?"—संपा.] होय भाऊ. ["एक दूरचा दूरध्वनी आहे, आणि कोणीतरी मरणोन्मुख, दूरध्वनीवर वाट पाहत आहे."]

197 एका दूरच्या दूरध्वनीवर, कोणीतरी मरणाला टेकला आहे. आणि मी तेथे जात असताना, सभा भाऊ नेविलकडे सुपूर्त करतो.

198 [भाऊ नेविल म्हणतात, "प्रभूमध्ये उत्तम आणि अदभूत दिवस! आज देवाने आपल्यासाठी काही अदभूत गोष्टी केल्या आहेत. माझ्या अपेक्षा संपूर्णरीत्या पूर्ण झाल्या आहेत."

["आपण सर्व एकत्र आपल्या पायावर उभे राहूया."]

199 ["बुधवारी रात्रीची सभा आहे ती लक्षात ठेवा. जास्त प्रार्थनेत राहा. सर्व असंतुष्ट, अनिश्चित हृदये देवाच्या अधिक संपर्कात राहा. 'वेळ खूप जवळ आहे. आता हीच वेळ आहे. आजच तारणाचा दिवस आहे.'"]

200 ["तुम्ही पाहुणे जे दुरून आलेले आहात, प्रभू तुम्हा प्रत्येकाला आशीर्वादित करो. आमची प्रार्थना आहे की देव तुम्ही परत घराकडे जात असता, तुमच्या प्रवासात तुमच्यावर दया करो. तुम्ही इथे आले ह्यामुळे आम्हाला खूप आनंद आहे. आणि तुम्हीही जात असता, आमच्यासाठी प्रार्थना करा, कि प्रभू ह्या जागेवरही आशीर्वाद देवो."]

201 ["आमच्या स्वर्गीय पित्या, आज रात्री तुझा दास आला आहे की तुझ्या दासाने आणि संदेष्ट्याने आपल्या कार्यालयाचे काम करावे. त्या भगदड्यात उभे राहून, कुंपण बनवित आहे. तुझ्या सेवकाची जी तीव्र भावना आहे त्याप्रमाणे ये, पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा दे आणि या पिढीबरोबर बोलण्यासाठी तुझ्या संदेष्टाचे कार्यालय दिले आहे. आज आणि रात्री हि आम्हास मदत कर की हा संदेश स्वीकारावा जो आमच्याकडे आला आहे, प्रभू, हा उपदेश, की आम्ही तयार व्हावे."]

202 ["जो आजच्या रात्री ह्या इमारतीच्या दरवाजांतून बाहेर जात आहे अशा प्रत्येक जणाला तू आशीर्वाद दे. असे होवो की जो आजार आम्हावर आहे, ज्याविषयी आम्हाला माहित देखील नाही, तुझ्या धन्य कृपेने आणि सामर्थ्याने तो बरा होवो आणि आमचा सांभाळ होवो आणि आम्हाला राखो, त्या वेळेपर्यंत जेव्हा तू आम्हाला दुसऱ्या बाजूला नेण्यासाठी तयार असशील. धैर्याहीन आणि निराश, भित्रे, आणि जे अशक्त आहेत अशा प्रत्येकाला तू आशीर्वादित कर."]

203 ["देवा, आम्ही आजच्या रात्री प्रार्थना करतो एका विशेष भेटीची, पवित्र आत्म्याच्या आशीर्वादाची, की तो आमच्या दरवाजामधील प्रत्येक वाटसरू, प्रत्येक यात्रेकरू, प्रत्येक अनोळखी, ह्यांच्यावर येवो. कलवरीच्या क्रूसावरील रक्ताच्या पांघरूणाने प्रत्येकाला, जो आजच्या रात्री ह्या दरवाजातून बाहेर जाईल त्याला पुरेसे पांघरूण दे."]

204 ["आम्ही आजारी असताना आम्हाला आरोग्य दे. आम्हाला तुझ्या महान सामर्थ्यामध्ये ठेव. आम्हाला सेवेसाठी अभिषेक कर. आमच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस आम्हाला तुझ्यापुढे प्रेमामध्ये चालू दे. आणि आम्ही ह्यासाठी तुझा गौरव करू, कारण आम्ही हे येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये आणि त्याच्यासाठी मागतो." आमेन.]

205 ["आणि देव तुम्हाला आशीर्वादित करो. तुम्ही इथे आलात ह्याचा आम्हाला आनंद आहे. सर्वजण एकमेकांच्या हातात हात मिळवूया."]

206 [मंडळी जाण्याअगोदर, एकामेकांच्या हातात हात मिळवून अभिवादन करत असताना, भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर परत येतात.]

207 [भाऊ ब्रॅन्हम कोणाशीतरी संवाद करतात—संपा.] तुम्ही जे काही माझ्यासाठी केले त्याची खरोखर दाद देतो, ते कार्ड आणि…?…होय श्रीमान. खरोखर दाद देतो…?…

208 [भाऊ ब्रॅन्हम भाऊ नेविल बरोबर बोलतात—संपा.] तर मग आम्ही विश्वासाचा खडक पाठविला…?…सभोवतालचा एक मनुष्य तेथे होता…?…तर मग मी त्याच्यामागे येशू ख्रिस्ताच्या नावात प्रार्थना पाठविली. एक तासापासून तेथे पडून आहे, नाडीचा ठोका नाही, श्वास नाही, काहीच नाही. श्वास नाही, नाडीचा ठोका नाही, श्वासोच्छवास नाही, काहीच नाही; डोळे वर करून, व्यासपीठावर पडला. [भाऊ नेविल म्हणतात, "ती प्रार्थना येईपर्यंत ती त्याला तेथेच पडून राहण्यास सोडील."]

209 हे अजून चालू आहे? [सुक्ष्मश्रवणी चालू आहे हे दर्शविण्यासाठी, भाऊ नेविल म्हणतात, "होय ते अजून चालू आहे."—संपा]

210 कृपया इथे लक्ष द्याल का? एका तासाआगोदर, वर इंडियाना येथे, एक तरुण प्रचारक, प्रचार करत असताना, व्यासपीठावर मृत्युमुखी पडले. एक प्रख्यात प्रचारक, वर इंडियाना येथे प्रचार करत. ते जेव्हा प्रचार करत होते, तेव्हा पुढे होऊन पडले आणि व्यासपीठावर मृत्यू पावले. तेथील पाळक आले आणि त्यांनी मला कॉल केला. ते आत्म्याच्या अभिषेकाखाली प्रचार करत असताना मृत्युमुखी पडले, पुढे होऊन पडले, डोळे वर करून, त्यांचा श्वासोच्छवास बंद झाला. त्यांना मृत घोषित केले आहे, ते एक तासापासून मृत झाले आहेत. आणि त्यांना कोणीतरी सांगितले की मंडळीला बोलवा आणि मला प्रार्थना करण्यास सांगा. म्हणून मी प्रार्थना केली आहे त्यांना प्रभू येशूच्या नावामध्ये परत आणण्यासाठी. तुम्ही माझ्याबरोबर विश्वासाने सामील व्हा की जेणेकरून ती प्रार्थना उद्देश चुकविणार नाही; त्याला ताजेतवाने करून पुन्हा परत आणील. धन्यवाद.

211 मी तुम्हाला बुधवारी बघेपर्यंत, देव तुम्हाबरोबर असो. जॉर्जिया आणि आजूबाजूच्या परिसरांतील तुम्ही लोकहो, बाय-बाय. देव तुम्हाबरोबर असो.

212 भाऊ पेट…?…[भाऊ ब्रॅन्हम सुक्ष्मश्रवणीपासून मागे फिरतात आणि दुसऱ्या लोकांबरोबर बोलू लागतात, पण त्यांचे संभाषण स्पष्ट एकू येत नाही—संपा.]

***दत्तकपणा*** *1* MAR60-0515E

(Adoption [1])

***दत्तकपण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मेरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी संध्याकाळी, 15 मे, 1960 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**<u>छपाईच्या हक्काची सूचना</u>**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org